**बिसेन डेन्टल केअर**

डॉ.दिप(पंकज) बिसेन   डॉ.खुशबू बिसेन(पटले)

दंत व मुख रोगविशेषज्ञ

बी.डी.एस.(नागपूर)

ताज मेरीप्लेक्स, गर्ल्स कॉलेज रोड गोंदिया

सकाळी:- ११ ते ३ सायं ६ ते ९ वाजेपर्यंत संपर्क:- ९५४५६८१८७०



साप्ताहिक http://berartimes.com

# बेरार टाईम्स

मुख्य संपादक :- खेमेंद्र कटरे, सहसंपादक :- सुरेश भदाडे






गोंदिया शहरात बेरार टाईम्सचा अंक चौरसिया पान सेंटर व साठवणे एजंसी जयस्तंभ चौक गोंदिया येथे उपलब्ध



आर.एन.आय.क्र. एमएएचएमएआर/२०११/४६५१० | वर्ष -१६ गोंदिया | अंक ३५ | बुधवार, दि.०५ ते ११ ऑगस्ट २०२६ | पृष्ठ-४ | किंमत-३ रुपये | Postal Reg.No.NPMFL/104/2025-2027


# भंडाऱ्यातून फुंकले मंडल यात्रेचे रणशिंग





**भंडारा :-** जातीनिहाय जनगणना तातडीने करण्यात यावी, तसेच ओबीसी, व्हीजेएनटी व एसबीसी समाजाच्या घटनात्मक हक्काची प्रभावी अंमलबजावणी व्हावी, या प्रमुख मागण्यांसाठी मसकल ओबीसी महामोर्चाफ्च्या वतीने विशेष आंदोलनाची हाक देण्यात आली.

सोमवार, ३ ऑगस्ट रोजी भंडाऱ्यातून मंडल जनगणना यात्रेचा शुभारंभ करण्यात आला. ९ ऑगस्टपर्यंत विदर्भातील ११ जिल्ह्यात मंडल जनगणना यात्रा भ्रमण करणार असून ओबीसी जनगणनेसाठी जनजागृती केली जाणार आहे.

जातीनिहाय जनगणना न झाल्यामुळे ओबीसी, व्हीजेएनटी आणि एसबीसी समाजाला दरवर्षी १५ हजार कोटी रूपयांचे शैक्षणिक व आर्थिक नुकसान सहन करावे लागत आहे. केंद्र सरकारने अनुसूचित जाती-जमाती प्रमाणे ओबीसी समाजासाठी स्वतंत्र कॉलम देऊन तातडीने जातनिहाय जनगणना करावी, केंद्रात ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रालय स्थापन

करावे, तसेच सरकारी सेवांमधील पदांचा बॅगलोंग तत्काळ भरण्यात यावा, या व अन्य मागण्यासंदर्भात मंडल जनगणना यात्राचे रणशिंग फुंकण्यात आले. शासनाच्या ओबीसींच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्यास देशभर तीव्र आंदोलन छेडण्यात येईल असा इशारा ओबीसी संघर्ष समिती व सकल ओबीसी महामोर्चाच्या वतीने देण्यात आला आहे.

ममहाज्योती या संस्थेला भरीव निधी देणे, ओबीसी विद्यार्थ्यांना सर्व अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्ती उपलब्ध करून देणे, प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र वसतिगृह उभारणे, घरकूल योजनेचे अनुदान ५ लाखापर्यंत वाढविणे, इतर मागास आर्थिक विकास महामंडळाला निधी देणे तसेच विद्यार्थ्यांना परदेशी शिष्यवृत्ती देणे आदी मागण्यांचाही समावेश आहे. मंडल जनगणना यात्रा विदर्भातील ११ जिल्ह्यांमधून भ्रमण करणार असून ओबीसी जनगणनेसाठी जनजागृती करणार आहे. ३ ऑगस्ट रोजी त्रिमूर्ती चौकातून यात्रेचा शुभारंभकरण्यात आला. ओबीसी नेते विजय वडेट्टीवार यांनी यात्रेचा शुभारंभ केला. यावेळी संघटनेचे पदाधिकारी व ओबीसीबांधव तसेच ओबीसी संघर्ष समिती भंडाराचे मुख्य संयोजक सदानंद इलमे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष मुकुंद साखरकर, डॉ. बाळकृष्ण सार्वे, रोशन उरकुडे, ओबीसी सेवा संघाचे अध्यक्ष गोपाल सेलोकर, संविधान संघर्ष समितीचे चंद्रशेखर टेंभुर्णे, रमेश शहारे, विष्णूदास जगनाडे, पंजाबराव कारेमोरे, राजेश मडाम`, ओबीसी क्रांती मोर्चाचे संजय मते यांच्यासह हजारो कार्यकर्ते व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## प्रमुख मागण्या

**-ओबीसींसाठी स्वतंत्र रकान्यासह तातडीने जातीनिहाय जनगणना.**
**-केंद्र सरकारच्या पातळीवर ओबीसींसाठी स्वतंत्र मंत्रालय.**
**-महाज्योती संस्थेला १ हजार कोटी रुपयांचा निधी.**
**-सरकारी सेवांमधील ओबीसींच्या एक लाख बॅकलॉग पदांची भरती**
**-ओबीसी विद्यार्थ्यांना १०० टक्के शिष्यवृत्ती आणि प्रत्येक तालुक्यात स्वतंत्र वसतिगृहे.**


## राजपत्रात उल्लेख नसल्यास महाआंदोलन

**जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्यात केंद्र सरकार राजपत्र जारी करणार आहे. या राजपत्रात ओबीसी जनगणनेचा स्वतंत्र रकाना नसल्यास देशव्यापी महाआंदोलन करण्यात येईल, असा इशारा यावेळी कोर्राम यांनी दिला.**

# दुसऱ्या टप्प्यातही जातगणना नाही?; "ओबीसी' नोंदीचा उल्लेख नसल्याने संभ्रम

**नागपूर:-** केंद्र सरकारने हिमाच्छादित प्रदेश असलेल्या राज्यांतील जनगणनेच्या दुसऱ्या टप्प्याची अधिसूचना जारी केली आहे. मात्र, यात जातनिहाय जनगणनेचा स्पष्ट उल्लेख नसून इतर मागासवर्गीयांच्या (ओबीसी) स्वतंत्र नोंदीबाबतही भाष्य नाही. त्यामुळे जनगणनेच्या राष्ट्रव्यापी दुसऱ्या टप्प्यातही जातनिहाय गणना होणार की नाही, याविषयी संभ्रम निर्माण झाला आहे. या मुद्द्यावर ओबीसी संघटना आक्रमक होऊ लागल्या असून केंद्र सरकारकडून स्पष्टीकरणाची मागणी करण्यात येत आहे.

जनगणनेचा कार्यक्रम जाहीर करताना जातनिहाय गणनेबाबत कोणतीही घोषणा करण्यात आली नव्हती. त्याचे पडसाद राजकीय पक्ष आणि संघटनांमध्ये उमटले होते.विशेषतः ओबीसींची नोंद स्वतंत्र करून त्याची आकडेवारी समोर आणली जावी, अशी मागणी आग्रहाने केली जात होती. हा दबाव वाढल्यानंतर केंद्र सरकारने जातनिहाय गणना करण्याचे जाहीर केले. जनगणनेच्या पहिल्या टप्प्यात घरगणना आणि दुसऱ्या टप्प्यात जातीनिहाय माहिती संकलित केली जाईल, असे सरकारने स्पष्ट केले होते. त्यानंतरही पहिल्या टप्प्यातील डिजिटल अर्जात ओबीसी जात नोंदीसाठी स्वतंत्र रकाना नसल्याबद्दल विरोधकांनी टीका केली होती. त्यावेळी दुसऱ्या टप्प्यात जातनिहाय नोंद करण्याची व्यवस्था करण्याचे सरकारने मान्य केले होते. मात्र, दुसऱ्या टप्प्यातील अधिसूचनेत त्याबद्दल उल्लेख नाही.केंद्रीय गृह मंत्रालयाने ३ ऑगस्ट २०२६ रोजी लडाख, जम्मू काश्मीरमधील हिमाच्छादित असमकालिक क्षेत्रे तसेच हिमाचल प्रदेश आणि उत्तराखंडमधील बर्फाच्छादित व दुर्गम भागांसाठी प्रसिद्ध करण्यात आलेल्या दुसऱ्या टप्प्याच्या अधिसूचनेत जनगणनेचे वेळापत्रक आणि प्रशासकीय प्रक्रिया यांचा उल्लेख आहे. मात्र,जातनिहाय जनगणना किंवा ओबीसींची स्वतंत्र माहिती संकलित करण्याबाबत उल्लेख करण्यात आलेला नाही. त्यामुळे सरकारच्या भूमिकेबाबत संभ्रम निर्माण झाला आहे. सकल ओबीसी महामोर्चाने केंद्राने पुन्हा ओबीसीची दिशाभूल केल्याचा आरोप केला असून, स्पष्टीकरण न मिळाल्यास आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला आहे.


रजिस्ट्री सं. डी.एल.- 33004/99 REGD. No. D. L.-33004/99

भारत का राजपत्र
The Gazette of India

सी.जी.-डी.एल.-अ.-03082026-275116
CG-DL-E-03082026-275116

असाधारण
EXTRAORDINARY
भाग II—खण्ड 3—उप-खण्ड (ii)
PART II—Section 3—Sub-section (ii)
प्राधिकार से प्रकाशित
PUBLISHED BY AUTHORITY

सं. 4125] नई दिल्ली, सोमवार, अगस्त 03, 2026/श्रावण 12, 1948
No. 4125] NEW DELHI, MONDAY, AUGUST 03, 2026/SHRAVAN 12, 1948

गृह मंत्रालय
(भारत के महारजिस्ट्रार का कार्यालय)
अधिसूचना
नई दिल्ली, 3 अगस्त, 2026

**का.आ. 4301(अ).**—केंद्रीय सरकार, जनगणना नियम, 1990 के नियम 6(क) और 6(घ) के साथ पठित जनगणना अधिनियम, 1948 (1948 का 37) की धारा 3 द्वारा प्रदत्त शक्तियों का प्रयोग करते हुए, यह घोषणा करती है कि:

(i) जनसंख्या की जनगणना संघ राज्यक्षेत्र लद्दाख और संघ राज्यक्षेत्र जम्मू-कश्मीर के हिमाच्छादित असमकालिक क्षेत्रों और हिमाचल प्रदेश तथा उत्तराखंड राज्यों के हिमाच्छादित असमकालिक क्षेत्रों में 1 सितंबर, 2026 से 30 सितंबर, 2026 तक किया जाएगा, साथ ही इसका पुनरीक्षण दौर 1 अक्टूबर, 2026 से 5 अक्टूबर, 2026 तक किया जाएगा;

(ii) उपर्युक्त जनगणना के संचालन के लिए, घर-घर जाकर जनसंख्या गणना प्रारंभ होने से ठीक पहले, 17 अगस्त 2026 से 31 अगस्त 2026 तक स्व-गणना का विकल्प उपलब्ध रहेगा;

# नागभीड-मार्कंडादेव रेल्वेमार्गासाठी दुहेरी सकारात्मक हालचाल

**गडचिरोली:-** गडचिरोली जिल्ह्याच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण मानल्या जाणाऱ्या नागभीड-मार्कंडादेव नवीन रेल्वेमार्ग विस्ताराच्या मागणीला मोठे यश मिळाले आहे. केंद्रीय अध्यक्ष श्रीमंत संतोष छबिलदास सुरपाम यांच्या सातत्यपूर्ण पाठपुराव्याची दखल घेत पंतप्रधान कार्यालयानेसंबंधित प्रस्ताव आवश्यक कार्यवाहीसाठी रेल्वे बोर्डाकडे पाठविला आहे. त्यानंतर आता गडचिरोली जिल्हाधिकारी कार्यालयानेही विभागीय आयुक्त, नागपूर यांच्याकडे वर्ग केल्याची माहिती अधिकृत पत्राद्वारे देण्यात आली आहे. त्यामुळे या रेल्वे प्रकल्पाच्या मागणीला प्रशासनाच्या विविध स्तरांवर गती मिळाल्याचे स्पष्ट झाले आहे.

मार्कंडेश्वर बहुउद्देशीय सुशिक्षित बेरोजगार विकास संस्था, मार्कंडादेव (ता. चामोर्शी)चे केंद्रीय अध्यक्ष श्रीमंत संतोष छबिलदास सुरपाम यांनी दि. ९ जुलै २०२६ रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह जिल्हाधिकारी, गडचिरोली यांच्याकडे सविस्तर निवेदन सादर करून नागपूर (इतवारी)-नागभीड ब्रॉडगेज रेल्वेमार्गाचा विस्तार ऐतिहासिक, धार्मिक व पर्यटनस्थळ असलेल्या मार्कंडादेव पर्यंत करण्याची मागणी केली होती. या निवेदनाची गंभीर दखल घेत प्रथम पंतप्रधान कार्यालयाने प्रस्ताव रेल्वे बोर्डाकडे पाठविला, तर त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयानेही विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव वर्ग करून पुढील प्रशासकीय प्रक्रियेला चालना दिली आहे.

निवेदनात चामोर्शी तालुक्यात वेगाने वाढणाऱ्या औद्योगिक विकासाचा विशेष उल्लेख करण्यात आला आहे. परिसरातील खनिज संपत्ती, वनउत्पादन प्रक्रिया उद्योग, कृषी व कृषीपूरक व्यवसाय तसेच नव्या औद्योगिक गुंतवणुकीमुळे भविष्यात मालवाहतूक आणि प्रवासी वाहतुकीची मोठी गरज निर्माण होणार आहे. रेल्वे सुविधा उपलब्ध झाल्यास उद्योगांना स्वस्त, जलद आणि विश्वासार्ह वाहतूक व्यवस्था मिळून नवीन उद्योगांना चालना मिळेल तसेच स्थानिक युवकांसाठी मोठ्या प्रमाणात रोजगारनिर्मिती होईल, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे.

याशिवाय नागपूर-गडचिरोली राष्ट्रीय महामार्गावरील वाढती वाहतूक, अपघातांचे प्रमाण आणि पर्यावरणपूरक वाहतुकीची गरज लक्षात घेता रेल्वेमार्गाची आवश्यकता अधोरेखित करण्यात आली आहे. रेल्वेमुळे रस्ते वाहतुकीवरील ताण कमी होऊन नागरिकांना सुरक्षित, किफायतशीर आणि वेगवान प्रवासाची सुविधा उपलब्ध होईल.

धार्मिक पर्यटनाच्या दृष्टीनेही हा रेल्वेमार्ग अत्यंत महत्त्वाचा ठरणार आहे. विदर्भाची काशी म्हणून प्रसिद्ध असलेल्या मार्कंडादेव येथील श्री मार्कंडेश्वर मंदिरात दरवर्षी लाखो भाविक दर्शनासाठी येतात. रेल्वे संपर्क उपलब्ध झाल्यास धार्मिक पर्यटनाला मोठी चालना मिळून स्थानिक व्यापार, हॉटेल व्यवसाय, वाहतूक सेवा, लघुउद्योग आणि पर्यटनाशी संबंधित व्यवसायांना मोठा फायदा होईल.

भविष्यात या रेल्वेमार्गाचा विस्तार अहेरी, सिरोंचा तसेच तेलंगणा राज्यापर्यंत करण्याची क्षमता असल्याने दक्षिण गडचिरोलीच्या आर्थिक, औद्योगिक आणि सामाजिक विकासाला नवी दिशा मिळू शकते. या मार्गामुळे राज्यांमधील संपर्क अधिक मजबूत होऊन व्यापार आणि दळणवळणालाही मोठी चालना मिळण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे.

पंतप्रधान कार्यालयाकडून रेल्वे बोर्डाकडे प्रस्ताव पाठविणे आणि त्यानंतर जिल्हाधिकारी कार्यालयाने विभागीय आयुक्तांकडे प्रस्ताव वर्ग करणे, या दोन्ही सकारात्मक घडामोडींमुळे नागभीड-मार्कंडादेव रेल्वेमार्गाच्या मागणीला अधिकृत स्तरावर बळ मिळाले आहे. आता या मार्गाचे सर्वेक्षण, तांत्रिक अभ्यास, आर्थिक व्यवहार्यता आणि पुढील प्रशासकीय प्रक्रिया लवकर सुरू होईल, अशी अपेक्षा व्यक्त होत असून गडचिरोली जिल्ह्यातील नागरिक, उद्योग क्षेत्र आणि विविध सामाजिक संघटनांनी या घडामोडींचे स्वागत केले आहे. हा रेल्वेमार्ग भविष्यात गडचिरोलीच्या विकासाचा नवा अध्याय ठरेल, असा विश्वास व्यक्त केला जात आहे

# मुर्री ते भागवत टोला बायपास मार्गावर खड्ड्यांचे साम्राज्य; प्रशासनाचे अक्षम्य दुर्लक्ष, अपघातांची टांगती तलवार!

**गोंदिया :-** तालुक्यातील अत्यंत वर्दळीचा व महत्त्वाचा मानला जाणारा मुर्री ते भागवत टोला बायपास मार्ग सध्या भीषण खड्ड्यांच्या विळख्यात सापडला आहे. या मार्गावरून दररोज होणारी अवजड व जड वाहनांची वाहतूक, त्यातच सध्या सुरु असलेल्या मुसळधार पावसाच्या सरी यामुळे या रस्त्याची दुरवस्था झाली असून रस्त्याचे पूर्णपणे तीन-तेरा वाजले आहेत. संपूर्ण बायपास मार्गावर ठीकठिकाणी मोठमोठे आणि खोल खड्डे पडल्याने हा रस्ता वाहनधारकांसाठी अत्यंत धोकादायक व ङ्गमरणमार्गफ ठरत आहे. मात्र, एवढी गंभीर परिस्थिती निर्माण होऊनही सार्वजनिक बांधकाम विभाग आणि स्थानिक लोकप्रतिनिधी या समस्येकडे सोयीस्करपणे दुर्लक्ष करत असल्याने नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त केला जात आहे.

हा बायपास मार्ग शहराबाहेरून जड वाहतूक वळवण्यासाठी निर्माण करण्यात आला होता. दररोज शेकडो ट्रक, डंपर, ट्रेलर तसेच प्रवासी वाहने या मार्गावरून जात असतात. परंतु, डांबरीकरण उखडल्यामुळे व रस्त्यावर जागोजागी भलेमोठे खड्डे तयार झाल्यामुळे वाहने चालवणे अत्यंत कठीण झाले आहे. पावसाळ्याचे दिवस असल्याने या खड्ड्यांमध्ये पाण्याचे तळे साचले आहे. पाण्यामुळे खड्ड्यांचा अंदाज येत नसल्याने दुचाकीस्वार घसरून पडण्याचे आणि लहान-मोठे अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्या वेळी तर या मार्गावरून प्रवास करणे म्हणजे मृत्यूला आमंत्रण देण्यासारखे झाले आहे.

या मार्गावरून प्रवास करणाऱ्या वाहनधारकांना व स्थानिक ग्रामस्थांना मानसिक व शारीरिक त्रासाला सामोरे जावे लागत आहे. खड्ड्यांमुळे वाहनांचे मोठे नुकसान होत असून अपघाताची भीती सतत डोक्यावर टांगती आहे. सार्वजनिक बांधकाम विभागाला (झथऊ) या संदर्भात वारंवार पूर्वकल्पना देऊनही विभागाचे अधिकारी ढिम्म हललेले नाहीत. तात्पुरत्या स्वरूपात खड्डे बुजवून बोळवण करण्याचे कामही विभागाने केलेले नाही, त्यामुळे बांधकाम विभागाच्या कारभारावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे.

दुसरीकडे, निवडणुकीच्या काळात विकासाच्या मोठ्या गप्पा मारणारे लोकप्रतिनिधी आता या जनतेच्या मूलभूत समस्येकडे पूर्णपणे दुर्लक्ष करत आहेत. लोकप्रतिनिधींच्या या उदासीन भूमिकेमुळे नागरिकांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे. लोकप्रतिनिधी आणि संबंधित विभाग एखादी मोठी दुर्घटना घडण्याची वाट पाहत आहेत का, असा सवाल संतप्त नागरिक विचारत आहेत.



जर सार्वजनिक बांधकाम विभागाने व लोकप्रतिनिधींनी या समस्येची दखल घेऊन मुर्री ते भागवत टोला बायपास मार्गाची तात्काळ दुरुस्ती केली नाही आणि डांबरीकरण करून खड्डे बुजवले नाहीत, तर तीव्र जनआंदोलन छेडण्याचा इशारा स्थानिक नागरिक व वाहनधारकांनी दिला आहे.




## संपादकीय

# मंडल दिवस चिरायू होवो!

७ ऑगस्ट म्हणजेच ओबीसी साजरा करतात तो मंडल आयोग दिन. होय, हा दिवस म्हणजे ओबीसी साठी सणोत्सवासारखा झालाय अलिकडे. पोळा बलिप्रतिपदा ओनम बिहू बेंदूर नागपंचमी वा मूळिनवासी अवैदिकांच्या इतर उत्सवांपेक्षाही काकणभर अधिक लोकप्रिय मंडल दिन. भारतीय खंडात सर्वदूर पसरलेल्या एवढ्या मोठ्या ओबीसी समूहाचा हा मुक्तीदिवस. होय, ओबीसीला आरक्षण मिळाले अनब ओबीसी अस्मिता मूळ धरु लागली या दिवसापासून. तीस वर्षापूर्वी मा. व्ही पी सिंग हे प्रधानमंत्री ओबीसीचे मसिहा ठरले.

कमंडलधारी अधर्मी कुपमंडूकांना ते बधले नाही. मंडलसाठी सरकार पडले तरी पर्वा नाही केली व्हीपींनी. नंतर ओबीसी चळवळीच्या मुखंडांनी प्राणपणाने हा दिवस मंडलदिन म्हणून अनोख्या पद्धतीने साजरा करत ओबीसींच्या विविध समस्या,मागण्या,ओबीसीच्या दैनावस्थेचे मंथन चिंतन विमर्शन सुरु झाले. ओबीसी विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती, नोकरीत आरक्षण, शैक्षणिक आरक्षण, क्रिमिलेयर यासंबंधी येणाऱ्या अडचणी ओबीसींना नवी ओळख देणाऱ्या ठरल्या. पण धर्माच्या नावाखाली वर्णजातीव्यवस्थेत ओबीसींना दिलेले शूद्रत्व, दुय्यम स्थान ओबीसींचे कमालीचे नुकसान करणारे, अन्यायकारक आहे ही विचार प्रक्रिया ओबीसीत सुरू झाली.

आरक्षण म्हणजे गरीबी दूर करण्याचा कार्यक्रम नसून जातीव्यवस्थेने पिढ्यानपिढ्या शिक्षण शासन प्रशासन आणि समाजातील प्रतिष्ठित मोक्याची पदं,निर्णय प्रक्रिया यंत्रणेत प्रतिनिधित्व होय.या आकलनामुळे ओबीसी आपली मूळ संस्कृती शेती श्रम क्रुषमायेशी निगडीत जीवनपद्धतीत शोधू लागले.वैदिकांनी केलेले तिचे ब्राम्हणीकरण ,त्यातून ओबीसीवर लादलेली धार्मिक गुलामी या अनुषंगाने सिंधु संस्कृती पासून ,आर्य आक्रमणापासून सूरू झालेला आर्य –अनार्य संघर्ष ,वैदिक– अवैदिक,वामन –बळी, बळीवंश,वैदिक– लोकायत, वैदिक –जैन, बुद्ध,धर्ममार्तंड– संतपरंपरा,क्रांती–प्रतिक्रांती,इथपासून तर ब्राह्मण– ब्राम्हणेतर संघर्ष यात ओबीसीचा सांस्कृतिक वारसा आता दिसतो आहे.

या दिवसाचे महत्व ओबीसींना अधिक यासाठी वाटत आहे, कारण मंडलनंतरच्या काळात ओबीसी जागरण मोठ्या प्रमाणात झाले. ओबीसी वर अन्याय कारक ठरलेलं उच्चजातीय वर्चस्व झुगारून दिल्याशिवाय पर्याय नाही ही सत्यशोधक ब्राम्हणेतर चळवळीची कार्यप्रणाली ओबीसींना खुणावत असताना ओबीसीमधील विविध जातीच्या जातसंघटनाही उदयास येऊन अवमान कारक जातीव्यवस्थेतील त्यांना मिळणारे स्थान नाकारले जाऊन प्रबोधनाकडे झुकलेल्या दिसतात. पुरोहिताशिवाय सामाजिक कार्य लग्नादि धार्मिक विधी करण्याची सत्यशोधकी परंपरा स्वीकारुन कार्य करणे ही बाब खूप महत्त्वपूर्ण होय. त्यामुळे ब्राम्हणी वर्चस्व फेकून देऊन जातीव्यवस्थेने लादलेले दास्यत्व नाकारता येते.धर्मग्रंथात ओबीसींना ज्या पद्धतीने अधिकार वंचित ठेवले ,ते अधिकार प्राप्तीसाठी हा संघर्ष होय.या टप्प्यावर आलेला हा ओबीसी लढा जातीजनगणनेच्या मागणीने आणखी सम्रुद्ध होत आहे.म्हणून सत्ताधारी नेतृत्व ओबीसींना काही दिल्याचा आभास निर्माण करण्याचा प्रयत्न करत असल्याचे ओबीसींना जाणवते आहे.कारण ओबीसी समूह आणि शेतकरी एकदा पेटला की कुणाचीही मुलाहिजा करणार नाही. हे ओबीसी विरोधक उत्तमपणे जाणून आहेत.

ओबीसी आंदोलकांचा मंडलदिवसाच्या निमित्ताने वाढलेला उत्साह या व्यवस्थेला धडकी भरणारा वाटला पाहिजे.जय ओबीसी हा नारा आता भारतभर गूंज उठवत, ङ्गआधा नही पुरा करो मंडल आयोग लागू करोङ्घ्या मागणीला नवी ऊर्जा देणारा आहे. हा ओबीसीचा महोत्सव आज साजरा होत असताना मंडलदिनाच्या ओबीसी शिलेदारांना अगणित सदिच्छा देऊ या. जय ओबीसी. जय जोतिबा...

**अनुज हुलके**

## शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तुमसरच्या नामांतरासाठी १५ ऑगस्टपासून बेमुदत आमरण उपोषण!

**तुमसर:–** स्थानिक शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेच्या (आयटीआय) नामांतरणाबाबत प्रशासनाकडून होत असलेल्या सातत्यपूर्ण विलंबाच्या निषेधार्थ स्वराज्य युवा एकता फाउंडेशनच्या वतीने आक्रमक पवित्रा घेण्यात आला आहे. संस्थेचे नाव तात्काळ महिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुमसरफकरण्यात यावे, या मागणीसाठी येत्या १५ ऑगस्टपासून आयटीआय प्रांगणात बेमुदत आमरण उपोषण सुरू करण्याचा इशारा सामाजिक संस्थेच्या वतीने देण्यात आला आहे.

यासंदर्भात औद्योगिक प्रशिक्षण संस्था तुमसरचे प्राचार्य केतन सोनपीपरे व तुमसर पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक यांना निवेदन सादर करण्यात आले आहे. यावेळी स्वराज्य संस्थेचे अध्यक्ष अमित मेश्राम, जिल्हा सोशल मीडियाचे बालचंद बोन्द्रे, सलमान पठाण, सुशांत नागदेवे, रुपेश भंडारे उपस्थित होते.

कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नाविन्यता विभागाच्या माध्यमातून राज्यातील विविध आयटीआयच्या नामांतरणाची प्रक्रिया सुरू करण्यात आली होती. यासंदर्भात लोकप्रतिनिधी व सामाजिक संघटनांच्या मागणीची दखल घेत व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण संचालनालयाने (पत्र क्र. ७/सीटीएस/नामांतरण/२०२६/४०५५, दि. १३ जुलै २०२६) तुमसर आयटीआयचे नाव हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था करण्याबाबतचा प्रस्ताव अपर मुख्य सचिव यांच्याकडे अंतिम निर्णयासाठी सादर केला आहे.

तथापि, आवश्यक त्या सर्व प्रशासकीय शिफारसी पूर्ण होऊनही शासन स्तरावर अंतिम निर्णय घेण्यास चालढकल केली जात आहे. स्वराज्य युवा एकता फाउंडेशनकडून यासंदर्भात वारंवार पाठपुरावा करण्यात आला, परंतु प्रशासनाच्या उदासीन धोरणामुळे अद्यापही शासन निर्णय जारी झालेला नाही.

प्रशासकीय विलंबाचा निषेध नोंदवत स्वराज्य युवा एकता फाउंडेशनने प्रशासनाला स्पष्ट इशारा दिला आहे की, येत्या १४ ऑगस्टपर्यंत नामांतरणाचा अधिकृत शासन निर्णय जारी न झाल्यास १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्यदिनी शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था, तुमसरच्या प्रांगणात बेमुदत आमरण उपोषण पुकारले जाईल. उपोषणादरम्यान उद्भवणाऱ्या कोणत्याही प्रसंगाला व बिघडणाऱ्या कायदा– सुव्यवस्थेला शासन आणि प्रशासन पूर्णपणे जबाबदार राहील, असे निवेदनात नमुद करण्यात आले आहे. याप्रकरणात शासन यावर काय निर्णय घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

तुमसर आयटीआयचे महिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थाफ असे नामांतर करण्याबाबत सर्व शिफारसी पूर्ण होऊनही शासन स्तरावर विलंब होणे क्लेशदायक आहे. प्रशासनाच्या या उदासीनतेमुळेच १५ ऑगस्टपासून बेमुदत उपोषणाचा मार्ग स्वीकारावा लागत आहे. शासनाने १४ ऑगस्टपूर्वी नामांतरणाचा अधिकृत निर्णय जारी करून या आंदोलनाची वेळ येऊ देऊ नये.ङ्घ

**–अमित मेश्राम,** संस्थापक अध्यक्ष, स्वराज्य युवा एकता फाउंडेशन तुमसर, जिल्हा भंडारा.

सदर बाब शासन स्तरावरील धोरणात्मक निर्णयाशी संबंधित असल्याने, सदर मागणीचा प्रस्ताव आणि उपोषणाचा इशारा पुढील योग्य ती प्रशासकीय कार्यवाही व शासन निर्णयासाठी तात्काळ सहसंचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण प्रादेशिक कार्यालय नागपूर यांच्याकडे पाठवण्यात आला आहे.

**–केतन सोनपीपरे,** प्राचार्य, शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था तुमसर, जिल्हा भंडारा.

स्वामीत्व, मुद्रक, प्रकाशक व संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे यांनी बेरार टाईम्स हे साप्ताहिक वृत्तपत्र अंगपाल पारधी, लोकजन प्रकाशन, लोकजन भवन, स्नेह नगर, तकिया वॉर्ड, भंडारा ता.जि.भंडारा येथे मुद्रीत करुन डोलारे एजन्सीसमोरील रस्ता,शिवनगर गोंदिया येथे प्रकाशित केले. संपादक खेमेंद्र हिरदीलाल कटरे, भ्रमणध्वनी क्र. ९४२३११२४३१ (पी.आर.बी. कायद्यानुसार जबाबदारी संपादकावर राहील) प्रसिद्ध झालेल्या मजकुराशी संपादक व प्रकाशक सहमत असतीलच असे नाही. (गोंदिया न्यायकक्षेत)

# आरोग्य सेवेत तंत्रज्ञानाची नवी क्रांती :१०२ रुग्णवाहिकांसाठी "कॅशलेस पेट्रोकार्ड' सुविधा

### जिल्ह्यातील २४ रुग्णवाहिकांना एचपीसीएलचे पेट्रोकार्ड; १०२ सेवा आता सर्व रुग्णांसाठी उपलब्ध

राज्यातील सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक तंत्रस्नेही, पारदर्शक आणि कार्यक्षम करण्याच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल उचलत १०२ रुग्णवाहिका सेवेसाठी "कॅशलेस पेट्रोकार्ड' या नाविन्यपूर्ण सुविधेचा शुभारंभ दि. ३० जुलै रोजी सार्वजनिक आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांच्या हस्ते मुंबईतील आरोग्य सेवा आयुक्तालयात करण्यात आला. या उपक्रमामुळे राज्यातील ३,१९५ रुग्णवाहिकांच्या इंधन व्यवस्थापनात पारदर्शकता येण्याबरोबरच सेवेची कार्यक्षमता वाढणार असल्याचा विश्वास आरोग्यमंत्र्यांनी व्यक्त केला.कार्यक्रमास आरोग्य सेवा आयुक्त संजय काटकर, अतिरिक्त आयुक्त जगन्नाथ विरकर, आरोग्य संचालक डॉ.नितीन अंबाडेकर, सहसंचालक डॉ.सुनिता गोलाईत, प्रकल्प संचालक (ईएमएस) रवींद्र सावंत,उपसंचालक जयंत मुळे तसेच दूरदृश्य प्रणालीद्वारे संचालक डॉ.विजय कंदेवाड यांचेसह राज्यातील सर्व जिल्हा आरोग्य अधिकारी, जिल्हा शल्यचिकित्सक, आरोग्य विभागातील वरिष्ठ अधिकारी आणि एचपीसीएल कंपनीचे प्रतिनिधी उपस्थित होते.




आरोग्य सेवा ही नागरिकांसाठी जीवनदायी व्यवस्था असून तिच्या बळकटीकरणासाठी तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर आवश्यक आहे.ङ्गकॅशलेस पेट्रोकार्डफ उपक्रमामुळे रुग्णवाहिकांच्या इंधन खरेदी प्रक्रियेत आर्थिक पारदर्शकता येईल, अनावश्यक विलंब टळतील आणि संपूर्ण व्यवस्थापन अधिक उत्तरदायी बनणार असल्याचे आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी म्हटले आहे.

सालेकसा, देवरी व गोरेगाव तालुक्यातील १८ प्राथमिक आरोग्य केंद्र व ६ ग्रामीण रुग्णालयांना एचपीसीएलचे पेट्रोकार्ड वितरण होणार असुन टप्प्याटप्प्याने उर्वरीत आरोग्य संस्थाना वितरण केले जाणार असल्याची माहीती जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांनी माहीती दिली आहे.

राज्यातील शासकीय वाहनांना वेळेवर इंधन मिळण्यात येणाऱ्या अडचणी लक्षात घेऊन आरोग्यमंत्री आबिटकर यांच्या संकल्पनेतून हा अभिनव उपक्रम साकारण्यात आला आहे.या माध्यमातून राज्यातील ३,१९५ रुग्णवाहिकांना एचपीसीएलचे ङ्गकॅशलेस पेट्रोकार्डफ उपलब्ध करून देण्यात येणार असून इंधन भरण्याची प्रक्रिया अधिक सुलभ आणि डिजिटल होणार आहे .

यापूर्वी माता व बालकांसाठी मर्यादित असलेली १०२ रुग्णवाहिका सेवा आता सर्व प्रकारच्या रुग्णांसाठी उपलब्ध करण्यात येणार आहे. ही सेवा अधिक सक्षम व प्रभावी करून भविष्यात १०८ रुग्णवाहिका सेवेला पर्यायी व्यवस्था निर्माण करण्याच्या दृष्टीने काम करण्यात येणार असल्याचे आरोग्यमंत्र्यांनी स्पष्ट केले आहे.

अत्याधुनिक तंत्रज्ञान आणि प्रभावी मॉनिटरिंगच्या माध्यमातून नागरिकांना अधिक जलद, विश्वासार्ह आणि दर्जेदार आपत्कालीन आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याचा शासनाचा प्रयत्न असल्याचेही आबिटकर यांनी स्पष्ट केले.

एचपीसीएलच्या सहकार्याने सुरू करण्यात आलेली ही सुविधा राज्यातील रुग्णवाहिका व्यवस्थापनात मोठा बदल घडवून आणेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

"कॅशलेस पेट्रोकार्ड' उपक्रमाच्या यशस्वी अंमलबजावणीसाठी आरोग्य आयुक्तालय, आयटी विभाग आणि प्रशासकीय अधिकाऱ्यांचे विशेष अभिनंदन करत, भविष्यातही तंत्रज्ञानाच्या प्रभावी वापरातून सार्वजनिक आरोग्य सेवा अधिक सक्षम, पारदर्शक आणि लोकाभिमुख करण्यासाठी शासन कटिबद्ध असल्याचा पुनरुच्चार आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी केला आहे.

## अवयवदान-जीवनदानाचा संकल्प अभियान ३ ते १५ ऑगस्ट दरम्यान,जनजागृतीचे विविध उपक्रम सुरू



**गोंदिया :–** महाराष्ट्रातील अवयवदानाचे प्रमाण वाढावे व अवयवदानाच्या प्रतीक्षेत असलेल्या रुग्णांना नवजीवन मिळावे यासाठी दि.३ ते १५ ऑगस्ट दरम्यान अवयवदान ही एक चळवळ म्हणून राज्यभरात राबविण्याचा संकल्प सार्वजनिक आरोग्य व कुटुंब कल्याण मंत्री प्रकाश आबिटकर यांनी केला आहे. त्या अनुषंगाने सार्वजनिक आरोग्य विभागाने सर्व जिल्ह्यात दि.३ ते १५ ऑगस्ट पर्यंत ङ्गअवयवदान पंधरवाडाफ संपूर्ण महाराष्ट्रात राबविले जाण्याचे मार्गदर्शक सुचना दिल्या आहेत.

सोमवार ३ ऑगस्ट रोजी के.टी.एस. जिल्हा सामान्य रुग्णालयात अभियानाचा शुभारंभ करण्यात आला. जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.पुरुषोत्तम पटले व जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अभिजीत गोल्हार यांचे मार्गदर्शक सुचनेनुसार अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ.तृप्ती कटरे व सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे यांचे हस्ते ङ्गअवयवदान पंधरवाडाफ अभियानाला हिरवी झेंडी दाखवून शुभारंभ करण्यात आला.

दि.३ ऑगस्ट रोजी अवयवदान प्रभातफेरी व शपथ घेण्याच्या माध्यमातुन जनजागृती करण्यात आली. प्रभातफेरी दरम्यान अतिरिक्त शल्यचिकित्सक डॉ.तृप्ती कटरे, सहाय्यक जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.अरविंदकुमार वाघमारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ.भारती जयस्वाल, जिल्हा विस्तार माध्यम अधिकारी विजय आखाडे, जिल्हा साथरोग अधिकारी डॉ.निरंजन अग्रवाल, शल्य चिकित्सक डॉ.गुरुप्रकाश खोब्रागडे, डॉ.राजेश बेलमकर, डॉ.अनिल आटे, डॉ.मिना वट्टी, डॉ.ज्योती राठोड, डॉ.कांचन भोयर, डॉ.सोनम जाधव, नेत्र जिल्हा शल्य चिकित्सक डॉ.चंद्रकिशोर पारधी, नेत्रदान समुपदेशक भाविका बघेले/नागपुरे, नेत्र सहाय्यक रिता अरोरा, योगशिक्षिका मनीषा पशीने, स्वाती पाटील, सपना खंडाईत, संध्या शंभरकर यांनी शहरात प्रभातफेरीने विविध पोष्टरच्या माध्यमातुन अवयवदानाची जनजागृती केली. यावेळी के.टी.एस. प्रांगणात अवयवदानाचा संकल्प घेवुन प्रतिज्ञा घेण्यात आली.

अवयवदानाबाबत समाजामध्ये जागरूकता निर्माण करणे, त्यासंदर्भातील गैरसमज आणि अंधश्रद्धा दूर करणे तसेच अधिकाधिक नागरिकांना अवयवदानासाठी प्रेरित करणे हा या पंधरवड्याचा मुख्य उद्देश आहे. अवयवदानामुळे अनेक गंभीर रुग्णांना नवजीवन मिळू शकते. त्यामुळे प्रत्येक नागरिकाने समाजहिताच्या या कार्यात सहभागी होऊन अवयवदानाचा संकल्प करावा,असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.यावर्षी ङ्गअवयवदान जीवनदानाचा सर्वोत्तम संकल्पफ या संकल्पनेवर आधारित विविध जनजागृती उपक्रम जिल्हाभर राबविण्यात येणार आहेत.

अवयवदानासाठी कार्यरत संस्थांच्या समन्वयातून नागरिकांना अवयवदानाची प्रक्रिया, त्याचे महत्त्व आणि कायदेशीर बाबींबाबत मार्गदर्शन करण्यात येणार आहे. जिल्ह्यातील सर्व आरोग्य अधिकारी, वैद्यकीय अधिकारी, आरोग्य कर्मचारी, आशा स्वयंसेविका तसेच सामाजिक संस्थांनी या अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आरोग्य विभागाने केले आहे.

पंधरवड्यानिमित्त जिल्ह्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्था, वैद्यकीय महाविद्यालये, शाळा, महाविद्यालये, स्वयंसेवी संस्था तसेच सामाजिक व धार्मिक संस्थांच्या सहभागातून जनजागृती रॅली, शपथविधी, व्याख्याने, चर्चासत्रे, पोस्टर व घोषवाक्य स्पर्धा, आरोग्य शिक्षण, समाजमाध्यमांद्वारे जनजागृती तसेच अवयवदानाविषयी यशोगाथा आणि अनुभव कथन यांसारखे विविध उपक्रम आयोजित करण्यात येणार आहेत.

## प्रधानमंत्री पीक विमा योजनेत सहभागी होण्यासाठी १० ऑगस्टपर्यंत मुदतवाढ

### जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी सहभागी होण्याचे आवाहन

**गोंदिया :–** गोंदिया जिल्हयात प्रधानमंत्री पिक विमा योजनेची अंमलबजावणी भारतीय कृषि विमा कंपनी लिमिटेड या कंपनीमार्फत करण्यात येत आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजनेसाठी जिल्हयातील भात पीक अधिसुचित केलेले असुन जिल्हयातील ६२१११ शेतकरी योजनेत सहभागी झाले आहेत. यावर्षी खरीप भात पिकासाठी शेतकऱ्यांनी भरावयाचा पिक विमा हप्ता रक्कम रु.६०/– प्रति हेक्टरी आहे. विमा संरक्षित रक्कम ६०,००० रु. प्रति हेक्टरी आहे. प्रधानमंत्री पीक विमा योजना खरीप हंगाम सन २०२६ अंतर्गत शेतकऱ्यांना योजनेमध्ये सहभागी होण्यासाठी अंतिम दिनांक १० ऑगस्ट २०२६ पर्यंत असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी योजनेमध्ये सहभागी होण्याकरीता आपल्या नजिकच्या बँक शाखेत तसेच आपले सरकार सेवा केंद्रामध्ये विमा हप्ता भरून सहभागी व्हावे, असे आवाहन जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी निलेश कानवडे यांनी केले आहे.

## राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेर अभ्यास दौरे : १७ ऑगस्टपर्यंत अर्ज करावे

**गोंदिया :–** राज्यातील शेतकऱ्यांचे केवळ उत्पादन व उत्पादकता वाढविणे हे ध्येय न राहता, उत्पादीत होणाऱ्या शेतीमालाची दर्जात्मक सुधारणा करण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा वापर शेतकऱ्यांनी करणे अत्यंत गरजेचे आहे. शेतीशी निगडीत घटकांबाबत जगात वेळोवेळी होत असलेले बदल, विकसित होत असलेले तंत्रज्ञान हे शेतकऱ्यांपर्यंत त्यांच्या गरजेनुरुप योग्यवेळी पोहचविणे आणि त्यासाठी आवश्यक सहाय्य व सोयीसुविधा पुरविणे गरजेचे आहे. त्यानुसार सन २०२६–२७ मध्ये राज्यातील शेतकऱ्यांचे देशाबाहेरील अभ्यास दौऱ्याचे आयोजन करण्यात येत आहे. सदर योजनेंतर्गत युरोप व चीन देशाची निवड करण्यात आली आहे.

# ६ वर्षांपासून पेन्शन अन् ग्रॅच्युएटीचा पत्ता नाही; गोंदियातील सेवानिवृत्त शिक्षकाची राष्ट्रपतींकडे दयामरणाची हाक!

**गोंदिया:–**येथील माताटोली म्युनिसिपल हायस्कूलमधून सेवानिवृत्त झालेले शिक्षक राजकुमार जैन गेल्या ६ वर्षांपासून पेन्शन, ग्रॅच्युएटी आणि इतर सेवानिवृत्ती लाभांपासून वंचित आहेत. ३५ वर्षे निष्ठेने ज्ञानदान करणाऱ्या या शिक्षकावर आज वयाच्या ६५ व्या वर्षी वैद्यकीय उपचार आणि कुटुंबाच्या उपजीविकेसाठी आर्थिक संकटाचा सामना करण्याची वेळ आली आहे.

६५ वर्षीय राजकुमार जैन हे सध्या मधुमेह आणि इतर विविध व्याधींनी ग्रस्त आहेत. पेन्शन रोखल्यामुळे जमापुंजी संपली असून, औषधोपचार व कौटुंबिक खर्च भागवणे अत्यंत कठीण झाले आहे. ज्या शिक्षकाने हजारो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवले, त्यांनाच आज या वयात उदरनिर्वाहासाठी धडपड करावी लागत आहे.

**६ वर्षांपासून न्यायाची प्रतीक्षा**

सेवानिवृत्तीनंतर जैन यांनी नगर परिषद, शिक्षण विभाग, जिल्हा प्रशासन तसेच राज्य सरकारकडे अनेकदा खटपटी केल्या. माजी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यापासून ते विद्यमान मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यापर्यंत सर्वांकडे निवेदने देऊन आपल्या व्यथेचा पाढा वाचला; मात्र प्रशासनाकडून केवळ आश्वासनांची खैरात मिळाली, ठोस कारवाई मात्र शून्य राहिली.



लोकप्रतिनिधी आणि अधिकाऱ्यांच्या उंबरठ्यांचे माप काढूनही कोणतीही मदत न मिळाल्याने त्यांनी प्रशासकीय यंत्रणेच्या संवेदनशीलतेवर तीव्र संताप व्यक्त केला आहे.

**राष्ट्रपतींकडे दयामरणाची मागणी करण्याचा इशारा**

प्रशासकीय दिरंगाई आणि हताशतेला कंटाळून राजकुमार जैन यांनी अखेरचा इशारा दिला आहे. जर थकीत पेन्शन, ग्रॅच्युएटी आणि इतर वैधानिक लाभ तात्काळ मंजूर करण्यात आले नाहीत, तर राष्ट्रपतींकडे पत्राद्वारे 'इच्छामरणाची' (दयामरण) परवानगी मागणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

राज्यात कर्मचाऱ्यांच्या व शिक्षकांच्या हिताच्या मोठ्या गप्पा मारल्या जातात; परंतु आयुष्यभर प्रामाणिकपणे सेवा बजावणाऱ्या शिक्षकाला सेवानिवृत्तीच्या ६ वर्षांनंतरही हक्काच्या पेन्शनसाठी दारोदारी भटकावे लागत असेल, तर ही प्रशासकीय व्यवस्थेची घोर संवेदनहीनता आहे.

पीढ्या घडवणाऱ्या या ज्ञानदात्याला वृद्धापकाळात सन्मान आणि सुरक्षेचा अधिकार वेळेत का मिळू नये, असा थेट सवाल आता उपस्थित होत आहे.

## माजी सैनिकांच्या पाल्यांना पंतप्रधान शिष्यवृत्ती : अर्ज करण्याचे आवाहन

**गोंदिया:–** शैक्षणिक वर्ष २०२५–२६ मध्ये बारावी, पदविका तसेच पदवी परीक्षेत किमान ६०% गुणाने उत्तीर्ण होऊन वर्ष २०२६–२७ मध्ये अभियांत्रीकी, वैद्यकीय, बी.डी.एस., बी.बी.एस., बी.सी.ए., बी.एस.सी. (बायोटेक), एम.सी.ए. नर्सींग, बी.फार्म. व इतर व्यवसायिक शिक्षण घेत आहेत त्या पाल्यांना केंद्रीय सैनिक बोर्ड दिल्ली यांचेकडून पंतप्रधान शिष्यवृत्ती देण्यात येते. तरी पात्र माजी सैनिक किंवा विधवांच्या पाल्यांनी केंद्रीय सैनिक बोर्ड दिल्ली यांच्या वेबसाईट ु.ड्डील.र्सीं.ळप यावर ऑनलाईन अर्ज भरुन सर्व आवश्यक कागदपत्रांसह जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, जिल्हाधिकारी कार्यालय परिसर, गोंदिया येथे ३१ डिसेंबर २०२६ पर्यंत सादर करावे, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, गोंदिया यांनी केले आहे.

# वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज

आज संपूर्ण जग हवामान बदल, वाढते प्रदूषण, जंगलतोड, अनियमित पाऊस, वाढते तापमान आणि नैसर्गिक आपत्ती अशा गंभीर समस्यांचा सामना करत आहे. या सर्व समस्यांचे मूळ कारण म्हणजे निसर्गाशी होत असलेली मानवी छेडछाड. विकासाच्या नावाखाली मोठ्या प्रमाणात जंगलांची कत्तल होत असून त्याचा परिणाम पर्यावरणावर आणि मानवी जीवनावर स्पष्टपणे दिसून येत आहे. अशा परिस्थितीत "वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही काळाची गरज" बनली आहे.

वृक्ष हे पृथ्वीचे फुफ्फुसे मानले जातात. झाडे कार्बन डायऑक्साइड शोषून घेऊन प्राणवायू सोडतात. त्यामुळे वातावरणातील प्रदूषण कमी होण्यास मदत होते. झाडांमुळे पावसाचे प्रमाण संतुलित राहते, भूजलपातळी वाढण्यास मदत होते, जमिनीची धूप रोखली जाते तसेच जैवविविधतेचे संरक्षण होते. असंख्य पक्षी, प्राणी, कीटक आणि सूक्ष्मजीव यांचे जीवन वृक्षांवर अवलंबून आहे. त्यामुळे झाडांचे संवर्धन म्हणजे संपूर्ण पर्यावरणाचे संवर्धन होय.

आज शहरांमध्ये काँक्रीटची जंगले वाढत आहेत. रस्ते, इमारती, उद्योग आणि इतर विकासकामांसाठी मोठ्या प्रमाणावर झाडांची तोड केली जाते. परिणामी उष्णतेत वाढ होत आहे. उन्हाळ्यात तापमान नवीन विक्रम प्रस्थापित करत आहे. अनेक भागात पाण्याची तीव्र टंचाई निर्माण होत आहे, तर काही भागात अतिवृष्टीमुळे पूरस्थिती उद्भवत आहे. हवामानातील या बदलांचा थेट परिणाम शेती, अर्थव्यवस्था आणि मानवी आरोग्यावर होत आहे.

वृक्षारोपण ही केवळ औपचारिकता नसून ती प्रत्येक नागरिकाची सामाजिक जबाबदारी आहे. अनेकदा विविध कार्यक्रमांत मोठ्या उत्साहाने रोपे लावली जातात; मात्र त्यांची पुढील काळात काळजी घेतली जात नाही. परिणामी बहुतेक रोपे काही दिवसांतच नष्ट होतात. म्हणूनच वृक्षारोपणाइतकेच वृक्षसंवर्धन महत्त्वाचे आहे. रोपांना नियमित



पाणी देणे, त्यांना जनावरांपासून संरक्षण देणे, खत घालणे, तण काढणे आणि आवश्यक ती निगा राखणे गरजेचे आहे. लावलेले रोप मोठे झाड होईपर्यंत त्याची जबाबदारी स्वीकारणे हीच खरी पर्यावरण सेवा आहे.

शाळा, महाविद्यालये आणि विविध सामाजिक संस्था वृक्षारोपणाच्या माध्यमातून समाजात जनजागृती करण्याचे महत्त्वपूर्ण कार्य करीत आहेत. विद्यार्थ्यांना प्रत्येक वाढदिवशी किंवा विशेष प्रसंगी एक झाड लावण्याची आणि ते जगविण्याची सवय लावली तर भविष्यात पर्यावरणपूरक पिढी तयार होईल. शाळेच्या परिसरात, गावातील सार्वजनिक ठिकाणी, नदी–नाल्यांच्या काठावर आणि मोकळ्या जागांवर स्थानिक हवामानाला अनुरूप वृक्षांची लागवड केल्यास त्याचा मोठा लाभ समाजाला मिळू शकतो.

शासनही विविध योजनांच्या माध्यमातून वृक्षलागवडीला प्रोत्साहन देत आहे. वनमहोत्सव, हरित महाराष्ट्र अभियान, सामाजिक वनीकरण यांसारख्या उपक्रमांमुळे लाखो वृक्षांची लागवड केली जात आहे. मात्र या मोहिमांचे खरे यश तेव्हाच मिळेल, जेव्हा प्रत्येक नागरिक या कार्यात सक्रिय सहभाग घेईल.

भारतीय संस्कृतीत वृक्षांना देवतांचे स्थान दिले गेले आहे. वड, पिंपळ, औदुंबर, नीम, आंबा यांसारख्या वृक्षांचे धार्मिक, औषधी आणि पर्यावरणीय महत्त्व अनन्यसाधारण आहे. आपल्या पूर्वजांनी निसर्गाचे जतन करण्याचा संदेश दिला होता. आज त्या परंपरेचे जतन करणे ही काळाची गरज आहे.

वाढत्या प्रदूषणामुळे अनेक श्वसनविकार, उष्माघात आणि इतर आरोग्यविषयक समस्या वाढत आहेत. झाडे वातावरण शुद्ध करतात, ध्वनीप्रदूषण कमी करतात आणि परिसराचे सौंदर्य वाढवतात. हिरवाईमुळे मानसिक तणाव कमी होतो आणि जीवन अधिक आनंदी बनते. त्यामुळे वृक्षारोपणाचा लाभ केवळ पर्यावरणालाच नव्हे तर समाजाच्या आरोग्यालाही होतो.

प्रत्येक नागरिकाने आपल्या वाढदिवशी, लग्नाच्या वाढदिवशी किंवा इतर आनंदाच्या प्रसंगी किमान एक झाड लावून ते जगविण्याचा संकल्प करावा. प्रत्येक गाव, प्रत्येक शाळा आणि प्रत्येक घर परिसर हिरवागार झाला तर पर्यावरणाचे संतुलन निश्चितच सुधारेल. वृक्षारोपण ही एक चळवळ बनली पाहिजे आणि वृक्षसंवर्धन ही प्रत्येकाची जीवनशैली झाली पाहिजे.

"एक व्यक्ती – एक वृक्ष, एक कुटुंब – दहा वृक्ष" हा संकल्प प्रत्यक्षात उतरविला तर भविष्यातील पिढ्यांना स्वच्छ हवा, शुद्ध पाणी आणि समृद्ध पर्यावरणाचा अमूल्य वारसा देता येईल. आज आपण लावलेले एक छोटेसे रोप उद्या हजारो जीवांना जीवनदान देणारे विशाल वृक्ष बनू शकते. म्हणूनच वृक्षारोपण व वृक्षसंवर्धन ही केवळ गरज नसून प्रत्येक नागरिकाचे राष्ट्रीय कर्तव्य आहे. चला, आजच एक वृक्ष लावूया, त्याचे संवर्धन करूया आणि हरित, समृद्ध व प्रदूषणमुक्त भारत घडविण्यासाठी हातभार लावूया.

**चंदु दुर्गे** विषय शिक्षक, बिरसोला

# लोककल्याणासाठी प्रशासनाचा पुढाकार कौतुकास्पद:खासदार राजेंद्र जैन

## ●गोंदियात "समाधान शिबिरा'ला उत्स्फूर्त प्रतिसाद; ●१७ हजारांहून अधिक लाभार्थ्यांना योजनांचा लाभ

**गोंदिया :-** शासकीय योजनांचा लाभ शेवटच्या घटकापर्यंत पारदर्शकपणे पोहोचवणे हेच लोककल्याणकारी राज्याचे ध्येय असून प्रशासनाने थेट जनतेच्या दारी जाऊन दिलेला हा पुढाकार अत्यंत कौतुकास्पद असल्याचे प्रतिपादन कार्यक्रमाचे अध्यक्ष राज्यसभा खासदार राजेंद्र जैन यांनी केले.

एकाच छताखाली सेवा देणे हीच खरी लोकसेवा : आमदार विनोद अग्रवाल

सर्व शासकीय सेवा एकाच छताखाली उपलब्ध करून देत सामान्य नागरिकांच्या चेहऱ्यावर आनंद निर्माण करणे हीच खरी लोकसेवा असल्याचे आमदार विनोद अग्रवाल यांनी उद्घाटनप्रसंगी सांगितले.




महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा जन्मदिवस व माजी उपमुख्यमंत्री स्व. अजितदादा पवार यांच्या जयंतीचे औचित्य साधून १ ऑगस्ट रोजी जलाराम लॉन, गोंदिया येथे छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत भव्य "समाधान शिबिर' उत्साहात पार पडले. या शिबिराला तालुक्यातील नागरिक, शेतकरी व लाभार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला.

२२ ते ३० जुलै २०२६ दरम्यान राबवलेल्या "कर्तव्य साधना सप्ताहा'त १२,९१३ व १ ऑगस्टच्या मुख्य शिबिरात ४,२४० अशा एकूण १७,१५३ लाभार्थ्यांना या मोहिमेतून थेट लाभ देण्यात आला. यामध्ये महसूल विभागातर्फे १,१८० शासकीय दाखले, १,२८० नवीन प्राधान्य कुटुंब राशन कार्ड, ७४८ खातेदारांच्या नाव दुरुस्तीसह ३६८ प्रकरणात वारस फेरफार नोंदी करण्यात आल्या. तसेच ग्रामीण भागातील २४५ व शहरी भागातील २५० निवासी अतिक्रमणधारकांना हक्काचे पट्टे वाटप करण्यात आले.

आरोग्य व कृषी सेवांतर्गत ९,१४५ आयुष्मान भारत कार्डचे वितरण करण्यात आले, तर "पीएम किसान' योजनेतील २९० शेतकऱ्यांचा बंद झालेला लाभ पुन्हा सुरू करण्यात आला. महिला सक्षमीकरणासाठी ङ्गउमेदफ प्रकल्पांतर्गत २१ महिला बचत गटांना १.१७ कोटी रुपयांचे कर्जवाटप, २४७ बेबी केअर किट व ७४ महिलांना मातृ वंदन योजनेचा लाभ देण्यात आला.

याप्रसंगी आमदार डॉ. परिणय फुके, अपर जिल्हाधिकारी अभिजीत घोरपडे, उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत, तहसीलदार समशेर पठाण, अपर तहसिलदार श्रीकांत कांबळे, न.प. मुख्याधिकारी संदीप बोरकर, पं.स. सभापती मुनेश रहांगडाले यांच्यासह विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते. शिबिरस्थळी २४ विभागांचे विशेष कक्ष, ८ नागरी सुविधा केंद्रे व २ आधार केंद्रांची सोय करण्यात आली होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक तहसिलदार समशेर पठाण यांनी केले, तर उपस्थितांचे आभार अपर तहसिलदार श्रीकांत कांबळे यांनी मानले. कार्यक्रमास शेतकरी, लाभार्थी व नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# सार्वजनिक व निस्तार जमिनींच्या हस्तांतरण प्रस्ताव स्थगित करा

**नवेगावबांध:-** येथील सार्वजनिक हिताच्या तसेच ग्राम स्थांच्या पारंपरिक निस्तार हक्काच्या जमिनी वन विभागाकडे हस्तांतरित करण्याच्या प्रस्तावास तातडीने स्थगिती देऊन ग्रामस्थांच्या हक्कांचे संरक्षण करावे, अशी आग्रही मागणी करीत ग्रामपंचायत व नवेगावबांध फाउंडेशनच्या वतीने ३१ जुलै रोजी पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांना देण्यात आले.

निवेदनात मौजा नवेगाव बांध येथील सर्वे क्रमांक १०५६, १२६६/१, १२७२ व १२७३ या जमिनींना मराखीव वनफ घोषित करण्याची प्रक्रिया सुरू आहे. या प्रक्रियेमुळे ग्रामस्थांचे पारंपरिक निस्तार हक्क बाधित होणार आहेत. स्मशानभूमी, गुरे चराई, जलाशय व उद्यान यांसारख्या सार्वजनिक सुविधांवर गदा येणार आहे. तसेच परिसरातील पर्यटन विकासाला मोठा फटका बसण्याची शक्यता आहे. ग्रामपंचायत, ग्रामसभा व ग्रामस्थांनी यापूर्वी वेळोवेळी दाखल केलेल्या हरकतींचा कोणताही योग्य विचार न करता हा निर्णय लादला जात असल्याचा गंभीर आरोप निवेदनातून करण्यात आला आहे.



सरपंच हिराताई पंधरे, नवेगावबांध फाउंडेशनचे अध्यक्ष विजय डोये व सचिव रामदास बोरकर यांनी याप्रकरणी जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, संबंधित मंत्री आमदारांकडे यापूर्वीही आक्षेप नोंदवून अपील केली आहे. या जमिनी नवेगावबांधच्या पर्यटन विकासासाठी कशा महत्त्वाच्या आहेत, हे त्यांनी पुराव्यासह पटवून दिले आहे. तसेच या गंभीर विषयावर आमदार राजकुमार बडोले यांनीही पावसाळी अधिवेशनात अतारांकित प्रश्न उपस्थित करून शासनाचे लक्ष वेधले होते.

निवेदन देताना राष्ट्रवादी काँग्रेस ओबीसी सेलचे अध्यक्ष किशोर तरोणे, जिल्हा परिषद माजी उपाध्यक्ष यशवंत गणवीर, पं. स. सभापती आम्रपाली डोंगरवार यांच्यासह स्थानिक लोकप्रतिनिधी व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

या निवेदनामुळे नवेगावबांध परिसरातील सार्वजनिक हिताच्या जमिनी, निस्तार हक्क आणि स्थानिक पर्यटन विकासाच्या प्रश्नाकडे प्रशासन आणि शासनाचे लक्ष वेधले गेले असून, पालकमंत्री यावर सकारात्मक व ठोस निर्णय घेतील, अशी आशा ग्रामस्थांनी व्यक्त केली आहे.

**या आहेत प्रमुख मागण्या**

वन विभागाच्या जमीन हस्तांतरणाच्या निर्णयाला तात्काळ स्थगिती द्यावी, ग्रामस्थ आणि ग्रामसभेच्या हरकतींवर पुनर्विचार करण्यात यावा, जिल्हास्तरावरून प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सर्व संबंधितांची सुनावणी घ्यावी व ग्रामस्थांचे पारंपरिक निस्तार हक्क व सार्वजनिक हिताचे रक्षण व्हावे आदी प्रमुख मागण्या असून यासाठींचे निवेदन पालकमंत्री यांना देण्यात आले आहे.

# धान बोनसचा शब्द पाळा;अन्यथा तीव्र जनआंदोलन काँग्रेसचा सरकारला इशारा

**गोंदिया:-**धान उत्पादक जिल्हा म्हणून ओळख असलेल्या गोंदिया जिल्ह्यातील शेतकऱ्यांना महायुती सरकारने दिलेला धान बोनसचा शब्द तात्काळ पाळावा; अन्यथा काँग्रेस गप्प बसणार नाही आणि संपूर्ण जिल्ह्यात तीव्र जनआंदोलन छेडले जाईल, असा रोखठोक इशारा जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने राज्य सरकारला देण्यात आला आहे.शेतकरी व सर्वसामान्यांच्या विविध ज्वलंत प्रश्नांवर जिल्हा काँग्रेस कमिटीच्या वतीने शुक्रवारी (ता. ३१) महामहीम राज्यपाल यांच्या नावे उपविभागीय अधिकारी चंद्रभान खंडाईत यांच्यामार्फत निवेदन सादर करण्यात आले. या प्रसंगी काँग्रेसच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी राज्य सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दुमदुमून सोडला अनब शासनाचा तीव्र निषेध नोंदवला.

ङ्गफडणवीसांनी जाहीर सभेत दिलेला शब्द पाळा!फ

निवेदनात काँग्रेसने नमूद केले आहे की, गोंदिया हा राज्यातील प्रमुख धान उत्पादक जिल्हा असून येथील बळीराजाला यापूर्वी दरवर्षी



हेक्टरी २० हजार रुपयांचा बोनस दिला जात होता. सन २०२४ मध्ये गोंदिया येथील जाहीर सभेत तत्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी महायुती सरकार पुन्हा सत्तेत आल्यास धान बोनसची रक्कम वाढवून देण्याची मोठी घोषणा केली होती. मात्र, सरकार स्थापन होऊन इतका काळ लोटला तरीही त्या आश्वासनाची पूर्तता झालेली नाही. त्यामुळे जिल्ह्यातील धान उत्पादक शेतकऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

काँग्रेसचा सत्ताधाऱ्यांवर प्रहार:ङ्गमहायुतीचे जिल्ह्यात दोन राज्यसभा खासदार, दोन विधानपरिषद सदस्य आणि चार आमदार प्रतिनिधित्व करत आहेत! एवढी मोठी ताकद हातात असतानाही धान बोनसच्या प्रश्नावर हे लोकप्रतिनिधी मूग गिळून गप्प का? त्यांनी कसलाही अपेक्षित पाठपुरावा केलेला नाही,ङ्ग असा थेट आणि आक्रमक आरोप काँग्रेसने निवेदनातून केला आहे.

धान बोनसची घोषणा: धान उत्पादक शेतकऱ्यांना वाढीव बोनस तातडीने जाहीर करून दिलासा द्यावा.खतांच्या किमतींवर वेसण: रासायनिक खतांच्या गगनाला भिडलेल्या वाढत्या किमतींवर शासनाने तात्काळ नियंत्रण आणावे.बोगस बियाणे विक्रेत्यांवर कारवाई: शेतकऱ्यांची फसवणूक करणाऱ्या बोगस बियाण्यांच्या विक्रीवर कठोर कायदेशीर कारवाई करावी.स्मार्ट मीटरची सक्ती थांबवा: वीज वितरण विभागाकडून सर्वसामान्यांच्या घरी लादली जाणारी ङ्गस्मार्ट मीटरफ्ची सक्ती तातडीने रद्द करावी. शेतकरी हित जपा: वाढता उत्पादन खर्च आणि शेतकरी-सर्वसामान्यांच्या प्रश्नांवर त्वरित सकारात्मक निर्णय घ्यावेत.

या आक्रमक आंदोलनात जिल्हा काँग्रेस अध्यक्ष अमर वराडे, नागपूर पदवीधर मतदारसंघाचे आमदार ॲड. अभिजीत वंजारी, जिल्हा परिषद विरोधी पक्षनेत्या उषाताई मेंढे, जिल्हा परिषद सदस्या उषाताई सहारे, छबुताई उके, जिल्हा महिला काँग्रेस अध्यक्षा वंदनाताई काळे, किरणताई कांबळे, ॲड. दुष्यंत किरसाण, सालेकसा नगरपंचायतीचे अध्यक्ष विजय फुंडे, डेमेंद्र रहांगडाले, निकेश मिश्रा, मनीष मेश्राम, रंजीत गणवीर, जीवन शरणागत, ओम पटले, राजकुमार पटले, वाय. टी. कटरे, कुणाल शेंडे, कुलदीप गुप्ता, राजेश चांदेवार यांच्यासह काँग्रेसचे शेकडो पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने रस्त्यावर उतरले होते.

**बेरार टाईम्सचे अंक व जाहिरातकरिता संपर्क करावे.**

**चौरसिया पान सेंटर गोंदिया, भास्कर कडव गोंदिया,सुरेश चन्ने देवरी, मुरलीधर करंडे आमगाव, संतोष खानोरकर गोंदिया, प्रितीराज मेश्राम गोरेगाव यांच्याकडे बेरार टाईम्स अंक व जाहिरातकरिता संपर्क करावे**

## शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रिया सुरु

**गोंदिया :-** शैक्षणिक सत्र २०२६-२७ करिता इतर मागास प्रवर्गातील मुला-मुलींसाठी शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेशासाठी ऑनलाईन अर्ज प्रक्रीया सुरु झालेली आहे. त्यानुसार इतर मागास बहुजन कल्याण विभागांतर्गत कार्यरत असलेल्या मुला-मुलींच्या वसतिगृहामध्ये १२ वी नंतरच्या अभ्यासक्रमामध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांनी प्रथम वसतिगृह प्रवेशाकरीता अर्ज भरण्यात यावा. मेरीट लिस्ट प्रमाणे वसतिगृहातील प्रवेश प्रक्रिया पुर्ण झाल्यानंतर ज्या विद्यार्थ्यांना वसतिगृहाचा लाभ मिळाला नाही, त्या विद्यार्थ्यांचे ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार व पंडीत दिनदयाल उपाध्याय स्वयंम योजनेमध्ये रुपांतरीत करण्यात येईल.

शासनाच्या https://hmas.mahait.org या ऑनलाईन पोर्टलवर १२ वी नंतर व्यावसायिक व अव्यावसायिक उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांकरीता वसतिगृह प्रवेशाकरीता दिनांक ७ ते ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत ऑनलाईन अर्ज भरुन अर्जाची प्रिंट व आवश्यक कागदपत्रे संबंधीत वसतिगृहात अथवा इतर मागास बहुजन कल्याण कार्यालयात विहीत मुदतीत सादर करावी.

गोंदिया जिल्ह्यातील इमाव, विमाप्र, विजाभज, दिव्यांग, अनाथ व आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (एथड) या विद्यार्थ्यांनी वसतिगृह तसेच आधार व स्वयंम योजनेचा लाभ घ्यावा. आवश्यक माहितीकरीता ओबीसी मुला-मुलींचे वसतिगृह, गोंदिया येथील गृहपाल तसेच सहाय्यक संचालक, इतर मागास बहुजन कल्याण, गोंदिया या कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन इतर मागास बहुजन कल्याण विभागाच्या सहाय्यक संचालक सविता किर्तीकर यांनी केले आहे.

# बँक खाते आधार लिंक नसल्यास धानाचे पैसे अडकणार!

## १५ दिवसांत बँक खाते आधारशी जोडण्याचे निर्देश

**गोंदिया:-**३१ जुलै शासनाच्या किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत धान विक्री करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी राज्य शासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. आगामी पणन हंगाम २०२६-२७ पासून धान खरेदीचे पैसे थेट आधार क्रमांकाशी संलग्न असलेल्या बँक खात्यातच जमा करण्यात येणार आहेत. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचे बँक खाते अद्याप आधारशी जोडलेले नाही, त्यांनी तातडीने खाते अद्ययावत करून घ्यावे, अन्यथा धान विक्रीचे पैसे मिळण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात.



अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण विभागाचे उपसचिव प्रमोद पाटील यांनी ३० जुलै रोजी याबाबत राज्यातील महाराष्ट्र राज्य को-ऑप. मार्केटिंग फेडरेशन, महाराष्ट्र राज्य सहकारी आदिवासी विकास महामंडळ, सर्व जिल्हा पणन अधिकारी आणि प्रादेशिक व्यवस्थापकांना लेखी निर्देश जारी केले आहेत.

शासनाच्या पत्रानुसार, एनपसीआय कडून प्राप्त झालेल्या माहितीत अनेक नोंदणीकृत शेतकऱ्यांची बँक खाती आधार क्रमांकाशी संलग्न नसल्याचे निदर्शनास आले आहे. अशा शेतकऱ्यांची यादी संबंधित खरेदी केंद्रनिहाय जिल्हा पणन अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात येणार असून, संबंधित शेतकऱ्यांशी संपर्क साधून त्यांची बँक खाती आधारशी जोडण्याची कार्यवाही तातडीने पूर्ण करण्याचे आदेश देण्यात आले आहेत.

विशेष म्हणजे, शासनाने ही संपूर्ण प्रक्रिया १५ दिवसांच्या आत पूर्ण करण्याचे निर्देश दिले असून, त्याबाबतचा अहवालही सादर करण्यास सांगितले आहे.

गोंदियासह पुर्व विदर्भात खरीप व उन्हाळी हंगामात धानाचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर होते. या निर्णयामुळे येथील हजारो शेतकऱ्यांवर थेट परिणाम होणार आहे. दरवर्षी शेतकऱ्यांकडून किमान आधारभूत किंमत योजनेअंतर्गत मोठ्या प्रमाणावर धान खरेदी केली जाते. त्यामुळे धान विक्रीचे पैसे वेळेत आणि कोणत्याही अडथळ्याशिवाय मिळावेत, यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या बँकेत जाऊन आधार क्रमांक बँक खात्याशी संलग्न आहे की नाही, याची तातडीने खात्री करून आवश्यक दुरुस्ती करून घेण्याचे आवाहन जिल्हा पणन अधिकारी विवेक इंगळे यांनी केले आहे.

शासनाच्या या निर्णयामुळे थेट लाभ हस्तांतरण (डीबीटी) प्रक्रियेत अधिक पारदर्शकता येणार असली, तरी आधार संलग्नता नसलेल्या शेतकऱ्यांनी वेळेत आवश्यक कार्यवाही न केल्यास धान खरेदीची रक्कम अडकण्याची शक्यता असल्याने जिल्ह्यातील शेतकऱ्यांनी याकडे गांभीर्याने लक्ष देण्याची गरज आहे.

## शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण करावे-जिल्हाधिकारी मंदार पत्की

**गोंदिया:-** राज्य शासनाने २ जून २०२६ रोजी जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ अंतर्गत कर्जमाफी, एकवेळ समझोता योजना (जढड) आणि प्रोत्साहनपर लाभ यांचा समावेश असून, या योजनेचा लाभ घेण्यासाठी पात्र शेतकऱ्यांनी तातडीने आधार प्रमाणीकरण (अरवहररी र्ऑींहशपींळलरींळेप) पूर्ण करावे, असे आवाहन जिल्हाधिकारी मंदार पत्की यांनी पत्रकार परिषदेत केले.

जिल्हाधिकारी कार्यालयात पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते त्यावेळी त्यांनी ही माहिती पत्रकारांना दिली. यावेळी जिल्हा उपनिबंधक सहकारी संस्था योगेशकुमार बाकरे, अग्रणी बँकेचे जिल्ह्याचे व्यवस्थापक कुशल तिराळे यावेळी उपस्थित होते.

जिल्ह्यातील काही व्यापारी बँकांच्या खात्यांमध्ये गावातील प्रसिद्ध यादी आणि शासकीय पोर्टलवरील थकबाकी रक्कमेमध्ये तफावत दिसून येत असल्याने शासनाने याबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. पोर्टलवरील थकबाकीची रक्कमच अंतिम व ग्राह्य धरली जाणार आहे.

# योजनांच्या नावावर शेतकऱ्यांचे वाटोळे थांबवा!

## सिंचन विहिरी, गोठ्यांसह अनेक कामांची देयके चार वर्षांपासून प्रलंबित, गोंदिया जिल्हा सरपंच संघटनेचा आक्रोश; शासनाला १५ ऑगस्टपर्यंतचा अल्टिमेटम

**गोंदिया :-** महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून शासनाने शेतकऱ्यांना समृद्धीची स्वप्ने दाखवत सिंचन विहिरी, गोठे, फळबाग आदी कामांसाठी प्रोत्साहित केले. शेतकऱ्यांनीही निधी वेळेत मिळेल या विश्वासावर कर्ज काढून ही कामे पूर्ण केली. मात्र, तीन ते चार वर्षांपासून देयके प्रलंबित असल्याने अनेक शेतकरी आर्थिक संकटात सापडले असून कर्जाच्या ओझ्याखाली त्यांचे जगणे असह्य झाले आहे. या गंभीर प्रश्नावर गोंदिया जिल्हा सरपंच संघटना आक्रमक झाली असून, १५ ऑगस्टपर्यंत प्रलंबित निधी वितरित न झाल्यास संविधानिक व लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा देण्यात आला आहे.

गोंदिया जिल्ह्यातील शेकडो शेतकऱ्यांसह ग्रामपंचायतींच्या सार्वजनिक विकासकामांची देयकेही अनेक वर्षांपासून रखडली आहेत. त्यामुळे ग्रामीण विकासाला मोठा फटका बसत आहे. साहित्य पुरवठादार, लाभार्थी शेतकरी आणि कंत्राटदार वारंवार निधीबाबत सरपंचांकडे तगादा लावत आहेत तर दुसरीकडे शासनाने निधी रोखून ठेवत नरेगा कामांवरील मस्टरही लॉक केल्याने नवीन कामांना ब्रेक लागला असून ग्रामीण रोजगारावरही विपरीत परिणाम होत असल्याची खंत सरपंच संघटनेने व्यक्त केली आहे.

या पार्श्वभूमीवर गोंदिया जिल्हा सरपंच संघटनेच्या वतीने मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांना मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद गोंदिया यांच्या मार्फत सविस्तर निवेदन सादर करण्यात आले.

निवेदनात प्रशासक म्हणून कार्यरत सरपंचांना नियमित सरपंचांप्रमाणे पूर्ण अधिकार व मानधन देणे, महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०२२-२३ पासूनची सर्व





प्रलंबित देयके तातडीने अदा करून नवीन कामांना मंजुरी देणे, जल जीवन मिशनअंतर्गत रखडलेल्या पाणीपुरवठा योजना तातडीने पूर्ण करणे, मुख्यमंत्री ग्राम सडक योजनेअंतर्गत ग्रामीण रस्त्यांची कामे मंजूर करणे, जिल्हा परिषद शाळांमधील रिक्त शिक्षक पदे प्राधान्याने भरणे, विविध स्पर्धांतील पुरस्कार निधी जाहीर झाल्यानंतर तीन महिन्यांच्या आत विजेत्या ग्राम पंचायतींना तत्काळ वितरित करणे, जिल्हा नियोजन समितीच्या माध्यमातून भेदभाव नीति न बाळगता सर्व ग्रामपंचायतींना समतोल निधी उपलब्ध करून त्यांच्या वैधानिक अधिकारांचे संरक्षण करणे तसेच सरपंचांच्या सुरक्षेसाठी कठोर कायदा करण्याची मागणी करण्यात आली आहे.

संघटनेच्या म्हणण्यानुसार, या सर्व प्रश्नांमुळे ग्रामीण विकासाची गती मंदावली असून ग्रामपंचायतींना विकासकामे राबविताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे शासनाने या मागण्यांवर तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा. अन्यथा दि. १५ ऑगस्ट २०२६ नंतर गोंदिया जिल्हा सरपंच संघटना राज्यव्यापी पातळीवर संविधानिक व लोकशाही मार्गाने तीव्र आंदोलन उभारेल, असा स्पष्ट इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. दरम्यान या सर्व गंभीर बाबींवर जिल्ह्यातील आमदार महोदयांनी पाहिजे तशी कठोर भूमिका न घेतल्याने प्रश्न मार्गी न लागल्याची खंत देखील व्यक्त करण्यात आली आहे. निवेदन सादर करताना जिल्हाध्यक्ष चंद्रकुमार बहेकार, विभागीय उपाध्यक्ष महेंद्र भांडारकर, मार्गदर्शक गंगाधर परशुरामकर, महिला जिल्हाध्यक्ष वर्षा पटले, जिल्हा उपाध्यक्ष मनीष गहेरवार, तिरोडा तालुकाध्यक्ष विनोद लिल्हारे, गोरेगाव तालुकाध्यक्ष नरेंद्र चौरागडे, अर्जुनी मोरगाव तालुकाध्यक्ष भोजराज लोगडे यांच्यासह लक्ष्मीकांत नाकाडे, सुरेंद्र परतेती, कैलास साखरे, सचिन मेश्राम, योगेश पटले, विद्या ठाकूर, शकुंतला कटरे, सरोजिनी दांदरे, नरेंद्र लंजे, बन्सीधर लंजे, संजय ईश्वरकर, घनश्याम शहारे, मोहिनी वऱ्हाडे, श्यामकला मेंढे, संतोष सतीशहारे तसेच जिल्ह्यातील शेकडो सरपंच उपस्थित होते.

# "छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व-समाधान' शिबिराला अभूतपूर्व प्रतिसाद!.

**सडक अर्जुनी:-** ग्रामीण भागातील जनतेच्या दैनंदिन समस्यांचे जागीच निवारण करणे, महसूल व प्रशासकीय कामकाज अधिक लोकाभिमुख, पारदर्शीव गतिमान करणे आणि शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ अंतिम घटकापर्यंत पोहोचवणे, या उद्देशाने सडक अर्जुनी येथील आशीर्वाद लॉन येथे ङ्गछत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व समाधानफ विधानसभा स्तरीय शिबिराचे भव्य आयोजन करण्यात आले. या शिबिराला हजारो नागरिकांचा अभूतपूर्व प्रतिसाद लाभला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राष्ट्रवादी काँग्रेसचे वरिष्ठ नेते व खासदार प्रफुल पटेल उपस्थित होते. तर स्वागताध्यक्ष आमदार राजकुमार बडोले, प्रमुख अतिथी आमदार अविनाश ब्राह्मणकर, अप्पर जिल्हाधिकारी अभिजित




घोरपडे, जिल्हा परिषद अध्यक्ष लायकराम भेंडारकर यांच्यासह तहसीलदार, विविध विभागांचे वरिष्ठ अधिकारी, पंचायत समिती व नगरपंचायतीचे लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

खासदार प्रफुल पटेल यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगितले की, महायुती सरकार सर्वसामान्यांच्या हितासाठी कटिबद्ध असून, शासनाच्या योजनांचा लाभ प्रत्येक पात्र आणि शेवटच्या घटकापर्यंत पोहोचवणे हीच सरकारची प्राथमिकता आहे. नागरिकांच्या तक्रारींचे तातडीने निवारण करून त्यांना शासकीय फेऱ्यांपासून मुक्ती देण्याच्या कडक सूचना त्यांनी उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या.

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत विधानसमा स्तरीय समाधान शिबीर स्वागताध्यक्ष आमदार राजकुमार बडोले यांनी शिबिराच्या माध्यमातून जमीनविषयक कागदपत्रे, दाखले, फेरफार आणि विविध योजना एकाच छताखाली उपलब्ध करून दिल्याबद्दल महसूल विभागाचे कौतुक केले.दिवसभर चाललेल्या या शिबिरात संजय गांधी निराधार योजना, पीएमकिसान, पीएमएफएमई, आयुष्मान भारत, उमेद, बचत गट कर्जवाटप, रेशन कार्ड वितरण, मालकी हक्काच्या सनदा, वनपट्टे, ङ्गजिवंत सातबाराफ अभियान, श्रावणबाळ योजना व राजमाता जिजाऊ महिला सशक्तीकरण योजना अशा विविध विभागांच्या योजनांचे प्रमाणपत्र व लाभहजारो लाभार्थ्यांना हस्तांतरित करण्यात आले. या प्रसंगी सीताताई रहांगडाले, लक्ष्मण भगत, चेतन वडगाये, आम्रपाली डोंगरवार, सुधाताई रहंगडाले, यशवंत गणवीर, डॉ. अविनाश काशीवार, तेजराम मडावी, राजेश कठाणे, लोकपाल गहाणे, रमेश चुन्हे, शिवाजी गहाणे, रजनीताई गिरीपुंजे, वंदना डोंगरवार, कामिनी कोवे, शाहिस्ता शेख, दीक्षा भगत, रीता लांजेवार, योगेश नाकाडे यांच्यासह परिसरातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**ग्रामपंचायत कार्यालय इंदोरा खुर्द तालुका तिरोडा जिल्हा गोंदिया**

**निविदा सूचना क्र. ०१/२०२६-२७ (पहिली वेळ)**

जावक क्रमांक:- दिनांक-०५/०८/२०२६

ग्रा.पं. इंदोरा खुर्द ता. तिरोडा, जि. गोंदिया अंतर्गत सन २०२६-२७ या वर्षात १५ वित्त आयोग (ग्रामपंचायत स्तर) योजनेंतर्गत १) नाली दुरुस्ती किशोर तुमसरे ते रामचंद्र हटवार अंदाजपत्रके रक्कम १०००००/- रुपये, २) विहीर तोंडी प्लॅटफफॉर्म बांधकाम लेंडीटोला अंदाजपत्रके रक्कम ५५०००/- रुपये, ३) लेंडीटोला शाळा कुंपण करणे अंदाजपत्रकीय रक्कम ७००००/- रुपये, ४) अंगणवाडी पेंटिंग इमारत क्रमांक १, २ रंगकाम पुरवणे अंदाजपत्रकीय रक्कम ९२०००/- रुपये, ५) ग्रामपंचायत भवन दुरुस्ती व रंगरंगोटी अंदाजपत्रकीय रक्कम ३०००००/- रुपये एकूण सर्व कामांची रक्कम ६१७०००/- बांधकामे पूर्ण करण्याकरिता तीन लिफाफा पद्धतीने टेंडर फि ५९०/-, इ. १ टक्केवारी दराने रक्कम ६१७०/- (IMD) च्या स्वरूपात बँक खात्यात भरल्याची सिलिफ बंद लिफाफा मध्ये भरून जमा करण्यात यावे, ऑफलाईन निविदा मंजूर जिल्हा परिषद सा.बा.वि. गोंदिया जिल्हा चा नोंदणीकृत कंत्राटदाराचा खुला प्रवर्ग यांचेकडून मागविण्यात येत आहेत. सदर निविदा केवळ ऑफलाईन पद्धतीने सादर करावयाची असून निवीदा बाबत इतर सविस्तर माहिती ग्रा.पं. कार्यालय इंदोरा खुर्द सूचना फलकावर उपलब्ध आहे.

**निविदा वेळापत्रक**

१) निविदा प्रसिद्धी दि. ०५/०८/२०२६, २) निविदा ऑफलाईन भरणा दि. ०६/०८/२०२६ ते १२/०८/२०२६ सायं ०५:०० वा. पर्यंत लिफाफा ग्रा.पं. इंदोरा खुर्द चे सचिव/सरपंच यांचे कडून रिसीव्ह घेणे बंधनकारक राहील., ३) मासिक सभेत निविदा उघडण्यात येणार ४) निविदा भरणा पूर्व बैठक होय., ५) निविदा शुल्क व अनामत रक्कम भरणा करणे., ६) निविदा स्वीकारणे/नाकारणे चे अधिकार ग्रामपंचायत इंदोरा खुर्द ने आपल्याकडे राखून ठेवले आहे.

ग्रामपंचायत इंदोरा खुर्द, खाते क्र. ५९४३०२०१००१८८१९ बँकेचे नाव-युनियन बँक शाखा तिरोडा, बँकेचे IFSC CODE क्र. UBIN०५५९४३१ या खात्यावर RTGS/NEFT/Direct Transfer किंवा ग्रामपंचायत इंदोरा खुर्द येथे रोखीने भरणा करणे.

**स्वा/-**
**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. इंदोरा खुर्द**

**स्वा/-**
**सरपंच**
**ग्रा.पं.इंदोरा खुर्द**

# डीपीसीच्या बैठकीत "हिरकणी कक्ष" घोटाळ्याचे जोरदार पडसाद

## "बेरार टाईम्स'च्या बातमीचा धमाका!पालकमंत्री नाईक यांचे जिल्हास्तरीय चौकशीचे आदेश!

**गोंदिया:–** बेरार टाईम्सने अत्यंत धडाकेबाज पद्धतीने चव्हाट्यावर आणलेल्या गोंदिया जिल्ह्यातील "हिरकणी कक्ष बांधकाम घोटाळ्या'चे पडसाद आज पार पडलेल्या जिल्हा नियोजन समितीच्या (DPDC) बैठकीत जोरदार उमटले. बेरार टाईम्सच्या त्या खळबळजनक बातमीची गंभीर दखल घेत लोकप्रतिनिधींनी आक्रमक भूमिका घेतली. सत्ताधारी असो वा विरोधी, सर्वच लोकप्रतिनिधींनी एका सुरात प्रशासनाला धारेवर धरत चौकशीची जोरदार मागणी लावून धरली.




आमदारांचा वाढता रोष आणि प्रकरणात झालेला भ्रष्टाचार पाहता, पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांनी या प्रकरणाची तातडीने दखल घेत उच्चस्तरीय चौकशीचे आदेश दिले आहेत. आता या संपूर्ण घोटाळ्याची पोलखोल करण्यासाठी जिल्हास्तरीय समिती गठीत करण्यात आली असून ती सखोल चौकशी करणार आहे. महिला व बालकांच्या सुविधेसाठी उभारण्यात येणाऱ्या "हिरकणी कक्षाच्या' बांधकामात मोठा आर्थिक गैरव्यवहार आणि निकृष्ट दर्जाचे काम झाल्याचे वृत्त "बेरार टाईम्स'ने प्रसिद्ध केले होते. या बातमीमुळे प्रशासकीय वतुर्ळात आधीच खळबळ उडाली होती. डीपीडीसीच्या बैठकीत या विषयावर चर्चा सुरू होताच लोकप्रतिनिधी अत्यंत आक्रमक झाले.

एकमुखाने प्रशासनाला विचारला जाब: खासदार राजेंद्र जैन, आमदार परिणय फुके, आमदार अभिजित वंजारी, आमदार राजकुमार बडोले, आमदार विनोद अग्रवाल, आमदार विजय रहांगडाले, आमदार संजय पुराम आणि जि. प. अध्यक्ष लायराम भेंडारकर या सर्वच प्रमुख लोकप्रतिनिधींनी हिरकणी कक्ष घोटाळ्यावरून प्रशासनाला जोरदार धारेवर धरले.

अधिकाऱ्यांच्या मिलीभगतचा आरोप: हिरकणी कक्षाच्या नावाखाली शासनाचा निधी हडपणाऱ्या भ्रष्टाचाऱ्यांना पाठीशी का घातले जात आहे? असा सवाल करत सर्वच नेत्यांनी सभागृहात अधिकाऱ्यांच्या कारभारावर तीव्र संताप व्यक्त केला.

पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांचे कडक निर्देश: लोकप्रतिनिधींचा आक्रमक पवित्रा पाहून पालकमंत्री इंद्रनिल नाईक यांनी प्रशासनाला तातडीने चौकशीचे निर्देश दिले. या प्रकरणात कोणताही हलगर्जीपणा सहन केला जाणार नाही, असे सांगत त्यांनी जिल्हास्तरीय समितीमार्फत चौकशी करण्याचे आदेश दिले.

बेरार टाईम्सने केलेल्या दणकेबाज पाठपुराव्यामुळे आणि खासदार राजेंद्र जैन, आमदार परिणय फुके, अभिजित वंजारी, राजकुमार बडोले, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, संजय पुराम तसेच जि. प. अध्यक्ष लायराम भेंडारकर यांच्या आक्रमक भूमिकेमुळे भ्रष्ट अधिकारी आणि कंत्राटदारांचे धाबे दणाणले आहेत. महिलांच्या सुविधेसाठी असलेल्या योजनेत डबाडबी करणाऱ्यांवर आता ही जिल्हास्तरीय चौकशी समिती काय कारवाई करणार, याकडे संपूर्ण गोंदिया जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

# जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास धरुन लोकहिताची कामे करा-पालकमंत्री इंद्रनील नाईक

## जिल्हा नियोजनासाठी ४३८ कोटींची तरतुद



**गोंदिया:–** जिल्ह्यातील विकास कामे करण्यासाठी विविध विभागाच्या अंमलबजावणी यंत्रणांना जिल्हा नियोजन समितीमधून निधी वितरीत करण्यात येतो. जिल्ह्याच्या विकासाचा ध्यास धरुन लोकहिताची कामे करा,असे निर्देश उद्योग राज्यमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी जिल्हा नियोजन भवनात आज संपन्न झालेल्या नियोजन समितीच्या बैठकीत दिले. वर्ष २०२६–२७ साठी ४३८ कोटी रुपयांची तरतुद करण्यात आलेली आहे.

जिल्हाधिकारी कार्यालय परिसरातील नियोजन भवन गोंदिया येथे आज पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची आढावा बैठक आयोजित करण्यात आली होती, त्यावेळी ते बोलत होते. खासदार राजेंद्र जैन, सर्वश्री आमदार डॉ.परिणय फुके, अविनाश ब्राम्हणकर, सुधाकर अडबाले, अभिजीत वंजारी, राजकुमार बडोले, विनोद अग्रवाल, विजय रहांगडाले, संजय पुराम, जिल्हा परिषदेचे अध्यक्ष लायकराम भेंडारकर, जिल्हाधिकारी मंदार पत्की, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी झेनिथ दोंतुला, उपवनसंरक्षक पवनकुमार जोंग, जिल्हा पोलीस अधीक्षक गोरख भामरे, उपायुक्त (नियोजन) अनिल गोतमारे, जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. रुपेशकुमार राऊत व विविध विभागाचे अधिकारी यावेळी उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण), अनुसूचित जाती उपयोजना तसेच आदिवासी उपयोजना अंतर्गत सन २०२५–२६ मध्ये मंजूर झालेल्या सर्व निधीचा १०० टक्के खर्च पूर्ण झाल्याची समाधानकारक माहिती आढावा बैठकीत समोर आली. यामुळे जिल्हा प्रशासनाच्या कार्यक्षम नियोजनाची पुन्हा एकदा प्रचिती आली आहे.

सन २०२५–२६ मध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत रु. २९८.०० कोटींची तरतूद करण्यात आली होती आणि मार्च २०२६ अखेर हा संपूर्ण निधी खर्च करण्यात आला. त्याचप्रमाणे अनुसूचित जाती उपयोजना अंतर्गत रु. ४६.०० कोटी आणि आदिवासी उपयोजना (ढडझ व जढडझ) अंतर्गत रु. ६२.८० कोटी निधीचा देखील १०० टक्के वापर करण्यात आला आहे.

दरम्यान, सन २०२६–२७ साठीच्या योजनांचा जुलै २०२६ पर्यंतचा प्रगती आढावा घेण्यात आला. यामध्ये जिल्हा वार्षिक योजना (सर्वसाधारण) अंतर्गत रु. ३२४.०० कोटींची कमाल आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली असून त्यापैकी रु. २६०.८२ कोटी महसुली तरतूद आणि रु. ६३.१७ कोटी भांडवली खर्चासाठी राखीव ठेवण्यात आले आहेत. आतापर्यंत रु. १.३४ कोटी निधी खर्च झाला आहे.

अनुसूचित जाती उपयोजनेसाठी सन २०२६–२७ मध्ये रु. ४५.०० कोटींची मर्यादा असून त्यापैकी आतापर्यंत रु. २६.१० लक्ष निधी वितरीत करण्यात आला आहे. तर आदिवासी उपयोजना (ढडझ) व क्षेत्रबाह्य उपयोजना (जढडझ) अंतर्गत रु. ६१.६१ कोटींची तरतूद असून आतापर्यंत रु. २६.९१ लक्ष निधी खर्च झाला आहे. स्वतंत्रपणे आदिवासी क्षेत्रबाह्य उपयोजना (जढडझ) साठी रु. ७.६३ कोटींची आर्थिक मर्यादा निश्चित करण्यात आली आहे.

बैठकीत सन २०२६–२७ मधील विविध कामांना मान्यता देण्याबाबतही चर्चा झाली. तसेच महसूल व वन विभागाच्या ७ जुलै २०२६ च्या शासन निर्णयानुसार ङ्गगतिमान प्रशासन तथा आपत्कालीन व्यवस्थेचे बळकटीकरणफ या योजनेअंतर्गत मंडळ स्तरावर ङ्गछत्रपती शिवाजी महाराज महसूल समाधान शिबीरफ राबविण्यास मंजुरी देण्यात येणार असल्याचे स्पष्ट करण्यात आले.

लोकप्रतिनिधींनी मांडलेल्या प्रश्नांना प्राथमिकतेने हाताळण्याच्या सूचना पालकमंत्र्यांनी या बैठकीत दिले. अलनिनो तसेच नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे नागरिकांचे तसेच शेतकऱ्यांचे नुकसान झाले असल्यास प्रशासनाने याबाबत संवेदनशीलपणे हे प्रकरण हाताळावे.

जिल्ह्यातील हिरकणी कक्ष स्थापनेमध्ये झालेल्या गैर कारभाराबाबत प्रशासनाने समिती नेमून न्यायपूर्ण चौकशी करुन योग्य ती कार्यवाही करावी, असे निर्देश त्यांनी आजच्या बैठकीत दिले. बैठकीचे संचालन जिल्हा नियोजन अधिकारी डॉ. रुपेशकुमार राऊत यांनी केले.

# प्रशासनाचे डोळे झाक; देवरी तालुक्यातील मुरपारच्या गावकऱ्यांनी श्रमदानातून उभारले 'छपराचे बस स्थानक'




**गोंदिया:–** देवरी तालुक्यातील आदिवासी बहुल मुरपार (सुंदरीदंड) या गावात आजही पायाभूत सुविधांचा मोठा अनुशेष पाहायला मिळत आहे. गावात बस सेवा उपलब्ध असूनही केवळ मबस थांब्याफची (यात्री प्रतीक्षालय) सोय नसल्याने चिमुकल्या शाळकरी विद्यार्थ्यांना आणि इतर प्रवाशांना भर उन्हात तसेच धो–धो पावसात उघड्यावरच बसची वाट पाहावी लागत होती. प्रशासनाचे या गंभीर समस्येकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याचे पाहून अखेर गावकऱ्यांनी स्वतः पुढाकार घेत अनोखा मार्ग शोधून काढला आहे.

लाकडे, झाडांच्या फांद्या आणि स्थानिक साहित्याचा वापर करून गावकऱ्यांनी एकत्र येत श्रमदानातून एक तात्पुरते 'छपराचे बस स्थानक' उभारले आहे. या उपक्रमामुळे आता लहान मुले, वृद्ध आणि इतर प्रवाशांचे ऊन–पावसापासून रक्षण होण्यास मदत होणार आहे.

**इच्छाशक्तीपुढे सरकारी बजेटही फिके!**

गावाचे सरपंच लखनलाल पंधरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, हा भाग आदिवासी बहुल असल्याने अनेक मूलभूत सुविधांपासून अजूनही वंचित आहे. गावातून देवरी मुख्यालय व इतर भागात जाण्यासाठी बस उपलब्ध असली तरी निवाऱ्याची सोय नव्हती. त्यामुळे प्रवाशांचे हाल होत होते. ही अडचण लक्षात घेऊन गावकऱ्यांनी कोणाच्याही मदतीची वाट न पाहता लोकसहभागातून हे छपराचे प्रतीक्षालय तयार केले. गावकऱ्यांच्या या आत्मनिर्भरतेने हे सिद्ध करून दाखवले आहे की, प्रबळ इच्छाशक्ती असेल तर कोणत्याही सरकारी निधीशिवाय किंवा लोकप्रतिनिधींच्या मदतीशिवाय मोठ्या समस्यांवर तोडगा काढता येतो.

गावकऱ्यांचा हा अनोखा उपक्रम आसपासच्या परिसरासाठी नक्कीच प्रेरणादायी ठरत आहे. मात्र, "गावकऱ्यांच्या या पुढाकारातून तरी सुस्तावलेले प्रशासन काही धडा घेणार का?" हा मुख्य प्रश्न अजूनही अनुत्तरितच आहे.

# प्रभावी अध्ययन-अध्यापनासाठी डिजिटल पॅनल बोर्ड अत्यंत गरजेचे



**अर्जुनी–मोरगाव :–** बदलत्या काळात शिक्षणाचा दर्जा उंचावण्यासाठी आणि विद्यार्थ्यांना आधुनिक तंत्रज्ञानाशी जोडण्यासाठी डिजिटल पॅनल बोर्ड हे अध्ययन–अध्यापनाचे अत्यंत प्रभावी व उपयुक्त साधन ठरत आहे, असे प्रतिपादन आ. राजकुमार बडोले यांनी केले. स्थानिक आमदार विकास निधीअंतर्गत अर्जुनी मोरगाव विधानसभा क्षेत्रातील शाळांसाठी मंजूर करण्यात आलेल्या २० डिजिटल पॅनल बोर्डच्या वितरण कार्यक्रमात ते बोलत होते.

यावेळी मार्गदर्शन करताना आ. बडोले म्हणाले, ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनाही शहरी भागातील विद्यार्थ्यांप्रमाणेच अद्ययावत शिक्षण सुविधा उपलब्ध करून देणे हे आपले मुख्य ध्येय आहे. डिजिटल पॅनल बोर्डमुळे शिक्षकांना क्लिष्ट विषय चित्रांच्या व व्हिडीओच्या माध्यमातून सोप्या पद्धतीने शिकवणे शक्य होईल. विद्यार्थ्यांमध्ये अभ्यासाविषयी उत्सुकता निर्माण होऊन त्यांची उपस्थिती वाढण्यास मदत होईल. गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा पाया अधिक मजबूत होईल, असा विश्वास व्यक्त केला.

यावेळी सडक अर्जुनी पं. स.चे सभापती चेतन वडगाये, डॉ. अविनाश काशिवार, किशोर तरोणे, गोरेगावचे गटविकास अधिकारी थोटे, गटशिक्षणाधिकारी एम. डी. पारधी, गटशिक्षणाधिकारी सुभाष बागडे, जनार्दन राऊत तसेच शिक्षण क्षेत्रातील मान्यवर, विविध शाळांचे मुख्याध्यापक उपस्थित होते.

# जनगणनेत ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम द्या

## देवळी व यवतमाळमध्ये ओबीसी मंडल यात्रेचे स्वागत



**यवतमाळ :–** मागासवर्गीय ओबीसी,व्हीजेएनटी, एसबीसी समाजाच्या न्याय्य हक्कांसाठी आणि स्वतंत्र मजातनिहाय जनगणनेफच्या मुख्य मागणीसाठी ममंडल यात्राफ काढण्यात आली आहे. ही मंडलयात्रा वर्धा येथून निघाली. देवळी, कळंबमार्गे यवतमाळ जिल्ह्यात दाखल झाली होती. शहरांमध्ये ओबीसी समाजबांधव, महिला व युवकांकडून मंडल यात्रेचे ढोल–ताशांच्या गजरात स्वागत करण्यात आले. यावेळी मंडल यात्रेचे मुख्य संयोजक उमेश कोर्राम म्हणाले, गत १० वर्षात ओबीसींची जनगणना झाली नाही.




यामुळे समाजाचे मोठे नुकसान झाले. आता जनगणना करताना ओबीसींसाठी स्वतंत्र कॉलम न दिल्यास महाआंदोलनाचा इशारा देण्यात आला.

ही रॅली दाखल होताच त्यांनी यवतमाळ येथे संत जगनाडे महाराज, महात्मा जोतिबा फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यांना व प्रतिमांना सकल ओबीसी महामोर्चाच्या माध्यमातून अभिवादन करण्यात आले.

यात्रेत ओबीसी सकल मोर्चा सयोंजक उमेश कोराम, ओबीसी अधिकार मंच सयोंजक खेमेंद्र कटरे, मुकुंद अडेवार, अशोक काकडे आदी मान्यवर सोबत होते. ही यात्रा पुढे निघाली आहे. या रॅलीच्या स्वागतासाठी डॉ. ज्ञानेश्वर गोरे, डॉ.विलास काळे, डॉ. दिलीप घावडे, प्रकाश जानकर, सुनीता काळे, प्रा. सविता हजारे, माया गोरे, दीपक वाघ, सविता वाघ, ज्ञानेश्वर रायमल, शशिकांत लोळगे, राजू देशमुख, दशरथ मडावी, विनोद काळे, देवराव जिपकाटे, गजानन गुल्हाने, रवी सरडे, ॲड. संजू चरडे, कल्याणी मादेश्वर, मादेश्वर यांच्या सोबतच काँग्रेस, भाजप, शिवसेना, वंचित बहुजन आघाडी, बहुजन समाज पार्टी, भारतीय मुक्ती पार्टी, बामसेफ आणि विदर्भातील सर्व सामाजिक संघटनांचे नेते, पदाधिकारी व नागरिक सहभागी झाले होते.

# ओबीसी जनगणनेसाठीचा लढा तीव्र करा-उमेश कोराम



**दारव्हा :–** ओबीसी समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी तसेच विद्यार्थी शिष्यवृत्ती व वसतिगृहाचा अनुशेष काढण्यासाठी ओबीसींची संख्या निश्चित नसल्यामुळे अर्थसंकल्पात पुरेशी तरतूद होत नाही. जनगणनेचा दुसरा टप्पा फेब्रुवारी २०२७ मध्ये होणार असल्याने ओबीसी जातनिहाय जनगणना

होण्यासाठी समाजातील सर्व घटकांनी जनजागृती करून हा लढा अधिक तीव्र करावा, असे आवाहन मंडल यात्रेचे मुख्य संयोजक उमेश कोराम यांनी केले.

ओबीसी कृती समिती दारव्हा शाखेच्या वतीने मंगळवारी (४ ऑगस्ट) ओबीसी जनजागृती सभा घेण्यात आली. यावेळी उमेश कोराम यांनी मार्गदर्शन केले. अध्यक्षस्थानी डॉ. मनोज राठोड होते.ओबीसी जनमोर्च्याचे डॉ. विलास काळे,ओबीसी अधिकार मंच सयोंजक खेमेंद्र कटरे,मुकुंद अडेवार,अशोक काकडे मारोतराव जावरे, रवी तरटे, गणेश भोयर, ज्ञानेश्वर रायमल, अनिल जीभकाटे, रवी चरडे, वसंतराव ढोरे आदी उपस्थित होते.

सूत्रसंचालन गजानन देऊळकर यांनी केले. आभार गणेश निमकर यांनी मानले. यशस्वीतेसाठी प्रा. नंदकिशोर जिरापुरे, प्रकाश शिरे, मोहन बाबरे, संजय निमकर, संजय दुधे, किशोर गुल्हाने, नंदकिशोर नेमाडे, अनिल बोरकर, बाबाराव काळे, गणेशराव पजगाडे, पंकज गुल्हाने, गजानन गुल्हाने, प्रभुदास तायडे, योगेश गुल्हाने, सतीश गुल्हाने, गणेश दुधे, वीरेंद्र काशीकर आदींनी पुढाकार घेतला. दारव्हा येथील सभेप्रसंगी नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गोरेगाव तालुक्यात लोकशाही दिनाचे आयोजन १० ऑगस्टला

**गोंदिया :–** गोरेगाव तालुक्यात महिन्याच्या तिसऱ्या सोमवारला १० ऑगस्ट २०२६ रोजी दुपारी २.३० वाजता लोकशाही दिनाचा कार्यक्रम तहसिलदार गोरेगाव यांचे अध्यक्षतेखाली, तहसिल कार्यालयातील सभागृहात आयोजित करण्यात आला आहे.

लोकशाही दिनानिमित्ताने तहसिलदार यांचेकडून जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी ऐकून घेण्यात येतील आणि शासनाच्या विविध विभागाचे तालुका स्तरावरील प्रमुख अधिकारी यांना त्या संबंधी कार्यवाही करण्याचे निर्देश देण्यात येतील.

तरी गोरेगाव तालुक्यातील जनतेच्या तक्रारी, अडचणी व गाऱ्हाणी असल्यास प्रपत्र–१ (अ) मध्ये विहीत केलेल्या अर्जामध्ये लेखी स्वरुपात सादर कराव्यात, असे आवाहन गोरेगाव तहसिलदार प्रज्ञा भोकरे यांनी केले आहे.

# जिल्हा परिषद शाळांमधील फर्निचरची अडचण दूर होणार

## डेस्क, बेंचसाठी ४ कोटी रुपयांचा निधी मंजूर : विनोद अग्रवाल यांचा पाठपुरावा

**गोंदिया :–** समग्र शिक्षाअंतर्गत जिल्हा परिषद शाळांमधील विद्यार्थ्यांसाठी डेस्क–बेंच व इतर आवश्यक फर्निचर उपलब्ध करून देण्यासाठी तब्बल ४ कोटी रुपयांचा निधी शासनाने मंजूर केला आहे. १६ जिल्हा परिषद शाळांमध्ये ३४ नवीन वर्गखोल्यांच्या बांधकामासाठी ५.२७ कोटी तसेच १६ जिल्हा परिषद शाळांमधील प्रमुख दुरुस्तीच्या कामांसाठी २ कोटी रुपयांचा निधी मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अनेक शाळांतील वर्षानुवर्षे प्रलंबित असलेल्या पायाभूत सुविधांच्या समस्या मार्गी लागणार असून विद्यार्थ्यांना अधिक सुरक्षित व दर्जेदार शैक्षणिक वातावरण उपलब्ध होणार असल्याचे आ. विनोद अग्रवाल यांनी सांगितले.



जि.प. पदाधिकारी, जि.प. सदस्य, शिक्षक, पालक तसेच ग्रामीण भागातील नागरिकांकडून जिल्हा परिषद शाळांमध्ये डेस्क–बेंचची तीव्र कमतरता असल्याचा प्रश्न गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने मांडला जात होता. जिल्हा परिषदेच्या सर्वसाधारण सभांमध्ये, विविध बैठका, ग्रामीण दौरे व जनसंपर्क कार्यक्रमांदरम्यान पदाधिकारी व सदस्यांनी आ. विनोद अग्रवाल यांच्याकडे विद्यार्थ्यांना सन्मानाने बसून शिक्षण घेता यावे यासाठी शाळांना आवश्यक फर्निचर उपलब्ध करून देण्याची मागणी वारंवार करण्यात आली होती.त्यावर आमदार विनोद अग्रवाल यांनी हा विषय केवळ फर्निचरपुरता मर्यादित न ठेवता ग्रामीण विद्यार्थ्यांचा सन्मान, दर्जेदार शिक्षण आणि समान शैक्षणिक संधी यांच्याशी निगडित असल्याचे शासनाच्या निदर्शनास आणून दिले. त्यांनी हा प्रस्ताव मुख्यमंत्री तसेच दोन्ही उपमुख्यमंत्र्यांसमोर प्रभावीपणे मांडत गोंदिया जिल्ह्यासाठी विशेष निधीची मागणी केली. शासनाने या प्रस्तावाला सकारात्मक प्रतिसाद देत गोंदिया जिल्ह्यासाठी प्रथमच ४ कोटी रुपयांचा स्वतंत्र फर्निचर निधी मंजूर करण्यात आला आहे.

# डीपीडीसीच्या बैठकीत खासदार राजेंद्र जैन यांनी मांडल्या विकासकामांबाबत विचारला थेट प्रश्न

**गोंदिया:–** जिल्हाधिकारी कार्यालयात आज राज्याचे पालकमंत्री ना. इंद्रनील नाईक यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या गोंदिया जिल्हा नियोजन समितीच्या (उझऊउ) बैठकीत विकासकामांचा जोरदार धडाका पाहायला मिळाला. या बैठकीत खासदार राजेंद्र जैन यांनी गोंदिया जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी अत्यंत महत्त्वाचे आणि जनहितार्थ मुद्दे मांडत प्रशासनाला चांगलेच धारेवर धरले आणि विकासकामांना गती देण्याचे निर्देश दिले.शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचा आढावा: गोंदिया (कुडवा) येथे खासदार प्रफुल पटेल यांच्या विशेष प्रयत्नांतून मंजूर झालेल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या (मेडिकल कॉलेज) निर्माणाधीन कामाची सद्यस्थिती काय? असा थेट प्रश्न त्यांनी विचारला. उर्वरित कामे अतिशय दर्जेदार, गुणवत्तापूर्ण आणि तातडीने पूर्ण करण्याबाबत त्यांनी प्रशासनाचा कडक आढावा घेतला.



खड्ड्यांमुळे बेहाल रस्त्यांची तातडीने दुरुस्ती करा: भूमिगत गटार योजनेच्या कामांमुळे गोंदिया शहरातील रस्त्यांची पूर्णपणे वाट लागली आहे. या दुरवस्थेकडे लक्ष वेधत संबंधित विभागाने तातडीने रस्त्यांची दुरुस्ती करून गोंदियाकरांना खड्ड्यांच्या त्रासातून दिलासा द्यावा, अशी ठाम मागणी त्यांनी केली.

ऑडिटोरियमच्या निधीचा मार्ग मोकळा करा: गोंदिया शहरासाठी प्रलंबित असलेल्या ऑडिटोरियमच्या अतिरिक्त निधीचा प्रश्न तातडीने निकाली काढून कामाला वेग देण्याची गरज त्यांनी प्रतिपादित केली.

भीमनगर–कुंभारेनगर येथे अंडरपास नको, उड्डाणपूलच हवा! भीमनगर–कुंभारेनगर रेल्वे क्रॉसिंग येथे प्रस्तावित असलेल्या अंडरपासऐवजी नागरिकांच्या सुरक्षिततेचा आणि भविष्यातील वाहतूक कोंडीचा विचार करून तेथे उड्डाणपूल उभारण्यात यावा, अशी महत्त्वपूर्ण सूचना त्यांनी मांडली.

तीर्थक्षेत्र व आध्यात्मिक स्थळांच्या विकासासाठी निधीची मागणी:परमपूज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर पवित्र अस्थी भीमघाट (गोंदिया),श्रीकृष्ण गौरक्षण, गौशाला परिसर पांजरापोल,गडमाता डुडुमाई देवस्थान (झालुटोला),कोरणी घाट या सर्व प्रमुख धार्मिक व सामाजिक स्थळांच्या विकासासाठी तात्काळ आवश्यक निधी उपलब्ध करून कामांचा धडाका सुरू करण्याची मागणी खासदार जैन यांनी लावून धरली.

खासदार राजेंद्र जैन यांनी मांडलेल्या प्रत्येक विषयाची गंभीर दखल घेत पालकमंत्री इंद्रनील नाईक यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कृती आराखडा तयार करून कामे मार्गी लावण्याचे निर्देश दिले आहेत. खासदार जैन यांच्या या आक्रमक भूमिकेमुळे गोंदिया शहरातील प्रलंबित विकासकामांना आता मोठी गती मिळणार असल्याचे चित्र स्पष्ट दिसत आहे.